वर्ष : सोळावे
डिसेंबर २०२४
अंक : बारावा
मूल्य १० रुपये
पृष्ठसंख्या ४८

# राजहंस ग्रंथवेध

ग्रंथप्रेमींच्या स्नेहसंवादासाठी
'राजहंस' प्रकाशनाचे व्यासपीठ

हिंदुत्व, मार्क्सवाद आणि भारत
विजय आपटे




चंद्रकांत कुलकर्णी सादर करीत आहे...




## नवी 'राजहंसी' पुस्तके




प्यासा
सुधीर नांदगावकर




दत्तप्रसाद दाभोळकरांच्या कविता

# एकच ध्यास...
# समाजाचा वैचारिक विकास



**सोशल मीडियाच्या जमान्यात वाचन संस्कृती जोपासणारे 'सद्‌गुरू सेवा प्रतिष्ठान'**









## पुस्तक वाटप

**'लेखन-वाचन अभियानां'तर्गत संस्कारक्षम गोष्टींच्या पुस्तकांचे वाटप**

- खटाव तालुक्यातील २७४ शाळांमध्ये बालसाहित्य संच स्वरूपात ९,००० पुस्तकांचे वाटप
- मावळ तालुक्यातील १६८ शाळांमध्ये पहिलीतील विद्यार्थ्यांना उजळणी पुस्तक भेट

## वाचनालय, ग्रंथालय

**'गाव तेथे वाचनालय आणि शाळा तेथे ग्रंथालय' या उद्देशाने ठोस वाटचाल**

- नंदुरबार जिल्ह्यातून सुरुवात करीत राज्यभरात ४३४ वाचनालयांची उभारणी
- तालुकास्तरावर अभ्यासिका व स्पर्धा परीक्षा वाचनालयांची उभारणी

## विद्यार्थी साहाय्य

**ग्रामीण भागातील गरजू व होतकरू विद्यार्थ्यांना शैक्षणिक मदत**

- ४५० विद्यार्थ्यांना सायकल वाटप; ७० दिव्यांगांना अत्यावश्यक साहित्य वाटप
- आदिवासी, अतिदुर्गम भाग व वीटभट्टी कामगारांच्या मुलांचे शैक्षणिक पालकत्व
- शहरातील झोपडपट्ट्या व पालांवरील मुलांना शिक्षणाची गोडी लावण्यासाठी प्रयत्न
- ६,००० महिलांना सॅनिटरी पॅड वाटप; २,००० ऊसतोड कामगार महिलांना साडी वाटप

## जुन्या/नव्या पुस्तकांचे करा सत्पात्री दान

महाराष्ट्रात वाचन संस्कृती रुजविण्यासाठी आम्ही 'गाव तेथे वाचनालय'उपक्रम राबवीत आहोत. कृपया, आपल्याकडील जुनी / नवी वाचनयोग्य पुस्तके देऊन आमच्या प्रयत्नांना बळ द्या. कथासंग्रह, काव्यसंग्रह, प्रेरणादायी पुस्तके, बालसाहित्य व स्पर्धा परीक्षा पुस्तके अशा सर्व प्रकारच्या पुस्तकांची आम्हाला गरज असते.

**पुस्तक दान करण्यासाठी WhatsApp क्रमांक 73783 78989**

## आर्थिक मदतीचे आवाहन

'सद्‌गुरू सेवा प्रतिष्ठान'चे समाजकार्य असेच पुढे सुरू ठेवण्यासाठी समाजातील दानशूर व्यक्ती, उद्योजक, खासगी संस्था इत्यादींनी संस्थेच्या विविध उपक्रमांकरिता आर्थिक मदत करावी, असे आवाहन करण्यात येत आहे. आपण केलेली मदत '८०जी'अंतर्गत प्राप्तिकर सवलतीस पात्र असेल.



**सचिन म्हसे**
संस्थापक, सद्‌गुरू सेवा प्रतिष्ठान

इंजिनीअर असलेल्या सचिन म्हसे यांनी कोरोना संसर्गाच्या काळात सामाजिक बांधिलकीच्या जाणिवेतून 'सद्‌गुरू सेवा प्रतिष्ठान' ही संस्था सुरू केली. विद्यार्थी दत्तक योजना आणि महिला सबलीकरणातील योगदानाबद्दल सचिन म्हसे यांना 'दक्षिण आशियाई प्रादेशिक देश (SAARC) ब्रिलियन्स २०२२' या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे.

## सद्‌गुरू सेवा प्रतिष्ठान

- नोंदणी क्रमांक - महाराष्ट्र /४१६/२०२१/(पुणे)
- ट्रस्ट रजि. नं. - एफ - ५६३२७/ पुणे
- 80G: ABNAS7596NF20224

६७/३, ज्ञानेश सोसायटी, वारजे माळवाडी, पुणे - ४११ ०५८
ई-मेल : sachinmhase@gmail. com
www.sadgurusevapratishthan.org
**+91 73783 78989, 99223 83341**

आमच्या फेसबुक पेजला भेट देण्यासाठी क्यूआर कोड स्कॅन करा

ग्रंथप्रेमींच्या स्नेहसंवादासाठी ‘राजहंस’ प्रकाशनाचे व्यासपीठ

*आम्हा घरी धन शब्दांचीच रत्ने । शब्दांचीच शस्त्रे यत्ने करू ॥*
*शब्दचि आमुच्या जीवाचे जीवन । शब्दे वाटू धन जनलोकां ॥*

**संत तुकाराम**

# राजहंस ग्रंथवेध

संपादक :
डॉ. सदानंद बोरसे

सल्लागार संपादक :
विनया खडपेकर

कार्यकारी संपादक :
आरती घारे

संपादन साहाय्य :
विनायक पणशीकर
नरेश सबजीवाले
शुभांगी देशपांडे
डॉ. उमेश करंबेळकर
पंकज क्षेमकल्याणी

अक्षरजुळणी :
यशोधन लोवलेकर

मुखपृष्ठ शीर्षकरचना :
बाबू उडुपी

मुखपृष्ठ-आतील मांडणी :
तृप्ती देशपांडे

वर्ष सोळावे :
अंक बारावा
१५ डिसेंबर २०२४
मूल्य : ₹ २०/-

अनुक्रम :


- संपादकीय / ५
- राजहंसी ग्रंथसृष्टी
  *लोकधुनांतून रागनिर्मिती*
  – डॉ. शिल्पा बहुलेकर / ९
- गाऊ त्यांना आरती
  *मदर तेरेसा* / १३
- चित्र पाहीन आवडी : नितीन हडप / १७
- असे जन्मले पुस्तक!
  *आबली* – प्रमोद प्रकाश धायगुडे / २१
- राजहंसी मोहोर : ऑडिओ पॉडकास्ट / २४
- आठवणींच्या खिडकीतून
  *सार्थक झाले लेखाचे*
  – श्रीराम रानडे / ३३
- क... कवितेचा
  - निरुपमा / ३७
- उद्‌गार
  *गोंदणखुणा : डॉ. प्रिया निघोजकर*
  - सुनील शिनखेडे / ३९
- राजहंसी पार / ४३
- वाचकांच्या मनातलं... / ४५


या अंकातील लेखांमधील मते ही त्या त्या लेखकांची असून त्यांच्याशी संपादक सहमत असतीलच, असे नाही.

पत्रव्यवहाराचा पत्ता : **राजहंस ग्रंथवेध, द्वारा राजहंस प्रकाशन**
१०२५ सदाशिव पेठ, पुणे ४११०३०. फोन - (०२०) २४४७३४५९
संपादक विभाग - ७४९८७११९३०.
E-mail : rajhansgranthvedh@gmail. com ● Website : www. rajhansprakashan. com

## वाचकांच्या अंगणात नव्याने उतरलेली 'राजहंसी' पुस्तके




भारताच्या सहा शेजारी देशांतील ठरावीक व्यक्तींना भारताचे नागरिकत्व ज्या कायद्याने मिळू शकते, त्या नव्या कायद्याच्या विविध पैलूंचा वेध घेणारे -

### नागरिकत्व दुरुस्ती कायदा

घटनात्मकता व वास्तवता

शेषराव मोरे

किंमत : ₹ २००/- । (ट.ख. ₹ ५०)

आज परिवर्तनाच्या चळवळी कुंठित झाल्याचे चित्र दिसते. अशाच शोधयात्रेत राजीव साने केवळ चिकित्सा करून थांबले नाहीत, तर स्वतंत्र नीतिशास्त्राच्या उभारणीची गरज त्यांनी ओळखली. भविष्यातील आवश्यक अशा विचारमंथनाच्या दिशेने जाणाऱ्यांना मार्गदर्शक ठरेल असे पुस्तक.

### स्फूर्तिवादी नीतिशास्त्र

राजीव साने

किंमत : ₹ २७०/- । (ट.ख. ₹ ५०)







'नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण' यंदापासून अमलात येतंय, अशा वेळी शिक्षणातल्या सगळ्या घटकांना पडणाऱ्या प्रश्नांची नेमकी उत्तरं देणारं, शिक्षणतज्ज्ञांनी लिहिलेलं मोलाचं पुस्तक.

### नवे शैक्षणिक धोरण

विद्यार्थी-पालकांसाठी मार्गदर्शन

प्रा. डॉ. नितीन करमळकर । मंगला गोडबोले

किंमत : ₹ २४०/- । (ट.ख. ₹ ५०)



# संपादकीय

*राजहंस वाचकांना आवडतील असे अनेक उपक्रम राबवत असते.*
*राजहंस ग्रंथवेध'च्या माध्यमातूनही वाचकांना सतत काहीतरी नवीन देण्याचा प्रयत्न आम्ही करत असतो. येणारे वर्ष आपल्या सर्वांना वाचनसमृद्ध करणारे ठरावे,*
*हीच शुभकामना!*

नमस्कार वाचकहो,

बघता बघता इंग्रजी वर्ष सरत आले. गेल्या वर्षभरात आपण काय काय कमावले आणि काय काय गमावले, याचा लेखाजोखा वैयक्तिक आणि सामाजिक अशा अनेक स्तरांवर मांडला जातो. या निमित्ताने राजहंस प्रकाशनाच्या कामाचाही आढावा तुमच्यासमोर मांडावा, असे वाटले.

राजहंस वाचकांना आवडतील असे अनेक उपक्रम राबवत असते. अगदी करोनाच्या काळातही आम्ही व्हिडिओच्या माध्यमातून लेखकांना वाचकांसमोर आणले होते. आपल्या आवडत्या लेखकाला प्रत्यक्ष पाहणे, व्हिडिओच्या माध्यमातून का होईना; हा छान अनुभव असल्याचे आम्हाला अनेक वाचकांनी कळवले होते. काळाची गरज ओळखून त्याबरोबर आपल्या कार्यपद्धतीत योग्य ते बदल करणे, ही राजहंसी संस्कृती. त्यानुसार आम्ही पारंपरिक प्रकाशनात अनेक बदल करत असतो. अनेकांना कामासाठी आपल्या घरापासून बरेच अंतर दूर जावे लागते, त्यात वाहतूकही प्रचंड प्रमाणात असते. अशा वेळी जाण्यायेण्यासाठी बराच वेळ खर्ची पडत असतो. आजच्या गतिमान आणि धकाधकीच्या युगात वेळ ही सर्वांसाठी अतिशय मौल्यवान गोष्ट आहे. तिचा सदुपयोग करून घ्यावा, अशी अनेकांची इच्छा असते. आपली आवडती पुस्तके या वेळेत वाचता आली तर... हे लक्षात घेऊन आम्ही ई-बुक प्रकाशित करण्यास सुरुवात केली, त्यालाही चांगला प्रतिसाद मिळत आहे.

आज बाजारात अनेक पुस्तके प्रकाशित होत असतात. त्यांचा परिचय अनेक माध्यमांतून वाचकांपुढे येत असतो. हाच परिचय प्रत्यक्ष लेखकाने करून दिला तर? ही कल्पना घेऊन आम्ही 'राजहंसी मोहोर' हे पॉडकास्ट २०२४च्या मे महिन्यात सुरू केले आणि त्याचे आतापर्यंत सलग ३१ भाग प्रसारित झाले आहेत.

त्यांची यादीही याच अंकात तुम्हाला वाचायला मिळेल. यात लेखकाशी संवाद साधून अगदी थोडक्यात पुस्तकाचा परिचय करून दिला जातो. या उपक्रमालाही श्रोत्यांनी, वाचकांनी उत्तम प्रतिसाद दिला आहे. याशिवाय वेबसाईट, फेसबुक, इन्स्टाग्राम, व्हॉट्सॲप इ. समाजमाध्यमांतूनही आम्ही सतत वाचकांच्या संपर्कात राहत असतो.

'राजहंस ग्रंथवेध'च्या माध्यमातूनही वाचकांना सतत काहीतरी नवीन देण्याचा प्रयत्न आम्ही करत असतो. याचाच एक भाग म्हणजे 'भारतरत्न' या सर्वोच्च नागरिक सन्मानाने गौरवण्यात आलेल्या व्यक्तींवरचे 'गाऊ त्यांना आरती' हे सदर. हा पुरस्कार मिळालेल्या व्यक्तींची यादी बघितली. साहजिकच आणखी एका गोष्टीकडे लक्ष गेले, ती म्हणजे या यादीतील तब्बल सोळा व्यक्तींवर, त्यांच्या कार्यावर आम्ही पुस्तके प्रकाशित केली आहेत. त्यांतील काही आत्मकथन स्वरूपात आहेत, तर काही चरित्र स्वरूपात आहेत. यात अनुवादित पुस्तकेही आहेत. या पुस्तकांतील काही चरित्रनायकांना हा पुरस्कार आम्ही पुस्तक प्रकाशित करण्याआधी, तर काहींना पुस्तक प्रकाशित झाल्यानंतर मिळाला आहे. या पुस्तकांतील संपादित अंश सध्या आम्ही प्रकाशित करत आहोत.

ग्रंथवेधमधील आणखी एक सदर म्हणजे 'आठवणींच्या खिडकीतून'. ज्येष्ठ लेखक आणि रंगकर्मी माधव वझे व श्रीराम रानडे या द्वयीने अनुभवलेले नाटक-सिनेमांतील रंजक अनुभव या सदरातून हे दोघे सांगत असतात. ते वाचताना नवी-जुनी अशा दोन्ही पिढ्या त्याचा आस्वाद घेत असतात, हे अनेक वाचकांनी आम्हाला कळवले आहे. त्याचबरोबर पुस्तक कसे लिहिले जाते, हे कुतूहल कायमच सामान्य माणसाच्या मनात असते. ते थोड्याफार प्रमाणात शमवण्यासाठी आम्ही 'असे जन्मले पुस्तक' हे सदर सुरू केले. त्यातून लेखक स्वतः पुस्तकनिर्मितीची प्रक्रिया उलगडून सांगत असतात. 'चित्र पाहीन आवडी' हेही असेच एक वेगळे सदर. एखादे चित्र, शिल्प कसे पाहावे; याची नजर वाचकाला देणारे. प्रत्येक वेळी त्यातून शिल्पकला, चित्रकला इत्यादी वेगवेगळ्या कलांचा रसास्वाद कसा घ्यावा, हे नितीन हडप अगदी सोप्या शब्दांत समजून देत असतात. येणाऱ्या नवीन वर्षातही असेच काहीतरी नवीन देण्याचा आमचा प्रयत्न असेल.

हे वर्ष सरत असताना मायमराठीच्या बाबतीत घडलेली अतिशय सकारात्मक घटना म्हणजे तिला मिळालेला अभिजात मराठीचा दर्जा. या अनुषंगाने आता येणाऱ्या नवीन वर्षात अनेक विधायक गोष्टी घडतील, अशी आशा आपण नक्कीच करू शकतो. त्याचबरोबर वाचनसंस्कृतीच्या दृष्टीने अतिशय दिलासा देणारी घटना म्हणजे 'पुणे पुस्तक महोत्सव, २०२४'. 'राष्ट्रीय पुस्तक न्यास' (नॅशनल बुक ट्रस्ट) या संस्थेच्या वतीने पुण्यातील 'फर्ग्युसन महाविद्यालया'च्या

मैदानावर दि. १४ ते २२ डिसेंबर २०२४ या कालावधीत हा महोत्सव होत आहे. गेल्या वर्षी या महोत्सवाला सर्व वयोगटांतील व्यक्तींनी भेट दिली. केवळ पारंपरिक पुस्तकवाचन एवढ्यापुरता हा महोत्सव नाही, तर त्याला आधुनिक तंत्रज्ञानाचीही जोड आहे, हे तरुणवर्गाच्या लक्षात आले. मागील वर्षी तरुणांचा सहभाग लक्षणीय होता. वर्षागणिक या महोत्सवाचे रूप अधिकाधिक लोकप्रिय होत जाईल आणि वाचनसंस्कृती लोप पावत चालली आहे, ही ओरड कमी होत जाईल अशी आशा बाळगायला नक्कीच वाव आहे.

खरे तर ज्ञान प्राप्त करण्यासाठी पुस्तकासारखा अन्य मार्गदर्शक नाही, तसेच ज्ञानप्रवाह सर्वदूर पोहोचविण्यासाठी पुस्तकासारखा अन्य मार्ग नाही. ज्ञान एखाद्या वर्गापुरतेच संकुचित ठेवल्यास समाज प्रगती करू शकत नाही, पुस्तकांमुळे ते समाजातील शेवटच्या माणसापर्यंत पोहोचते. पुस्तकामुळे व्यक्तीचे विचार घडतात आणि त्यातून ती व्यक्ती घडत असते. व्यक्तीला जीवनाची दिशा सापडते. तिच्या विचारांच्या कक्षा रुंदावतात. पुस्तके आपल्यात सामाजिक जाणिवा निर्माण करतात. समाजात कोणते साहित्य वाचले जाते, यातून समाजाचे प्रतिबिंब पाहायला मिळते. ऐतिहासिक पुस्तकांच्या माध्यमातून आपली स्वत:ची ओळख, स्वातंत्र्याचे मोल समजते. चांगले व सुखी तसेच समाधानी व यशस्वी जीवन यांतील फरक समजून घेण्यासाठी पुस्तके खूप मोलाची भूमिका बजावतात, म्हणूनच जीवनाचे विविध पैलू समजून घेण्यासाठी विविध प्रकारची पुस्तके वाचली पाहिजेत. पुस्तके हा आपला अनमोल ठेवा आहे. राष्ट्राकडे असलेल्या पैशाच्या सुबत्तेपेक्षा पुस्तकरूपी विचारांची संपत्ती किती मोठी आहे, यावरून राष्ट्राचे वैभव ठरते. पुस्तकांच्या रूपाने पुढच्या पिढीपर्यंत ज्ञान पोहोचविणारा पुस्तक महोत्सव चांगल्या व मानसिकदृष्ट्या सुदृढ समाजनिर्मितीचे आणि राष्ट्रनिर्मितीचे महत्त्वाचे साधन आहे. त्यामुळेच मुलांना आणि खरे तर वाचनापासून दूर गेलेल्या सर्वांनाच पुस्तकापर्यंत पोहोचविण्यासाठी पुस्तक महोत्सवासारखे उपक्रम राबवणे किती महत्त्वाचे आहे, हे यातून दिसले.

पुणे पुस्तक महोत्सव खऱ्या अर्थी वाचन, कला, साहित्य, खाद्य अशा विविध संस्कृतींचा संगम असल्याचे सर्वांच्याच लक्षात आले. अशाच प्रकारचे महोत्सव देशभरात अनेक ठिकाणी राबविले जावोत आणि त्याद्वारे वाचनसंस्कृती वृद्धिंगत होवो, हीच प्रार्थना आपण त्या विद्येच्या देवतेला करू या.

येणारे वर्ष आपल्या सर्वांना वाचनसमृद्ध करणारे ठरावे, हीच शुभकामना!

***आरती घारे***
कार्यकारी संपादक

## वाचकांच्या अंगणात नव्याने उतरलेली 'राजहंसी' पुस्तके



माणसात लपलेल्या हिंस्रतेचे
अनेकविध पदर उलगडून दाखवणारा,
त्याच्यातल्या माणूसपणाचेही
दर्शन घडवणारा कवितासंग्रह...

### युद्धानंतर...

आदित्य दवणे

किंमत : ₹ १८०/- । (ट.ख. ₹ ५०)

एव्हरेस्ट शिखर सर करण्याच्या अनावर ओढीपायी
तीन पिढ्यांमध्ये निर्माण झालेले ताणतणाव, संघर्ष
आणि परस्परांना समजून घेण्याचे प्रयास
चित्रित करणारी, सत्यघटनेवर आधारित कादंबरी!

### ज्याचं त्याचं एव्हरेस्ट

मृणालिनी चितळे

किंमत : ₹ ३५०/- । (ट.ख. ₹ ५०)





आपल्याही नकळत आपल्या रोजच्या जगण्याचा
भाग झालेल्या टीव्ही मालिका.
त्याबद्दल स्वत:ला आणि प्रेक्षकांना पडणाऱ्या
अनेक प्रश्नांची उत्तरं देणारं,
'मालिका' या विषयावर मार्गदर्शन करणारं पुस्तक...

### टीव्ही, मालिका आणि बरंच काही...!

मुग्धा गोडबोले

किंमत : ₹ ३००/- । (ट.ख. ₹ ५०)

# राजहंसी ग्रंथसृष्टी

## ‘लोकधुनांतून रागनिर्मिती’चा वेधक शोध

*कुमार घराणे निर्माण होण्यापेक्षा ‘कुमार प्रभाव’ अधिक महत्त्वाचा कसा आहे हे लेखिकेने पेश केले आहे.*

संगीतक्षेत्रातील सृजनशील वाग्गेयकार, मैफलगायक पं. कुमार गंधर्व यांनी मालवी लोकधुनांतून अकरा धुनरागांची निर्मिती केली. डॉ. साधना शिलेदार यांनी या धुनरागांपासून प्रेरणा घेऊन लोकसंगीताचा मुळातून अभ्यास केला आणि स्वनिर्मिती केली. ‘लोकधुनांतून रागनिर्मिती’ या त्यांच्या पुस्तकात स्वनिर्मित राग ऋतू, राग अनुप आणि राग गोधूलि हे तीन राग आणि या रागांची शास्त्रशुद्ध पद्धतीने मागोवा घेत लिहिलेली निर्मितीप्रक्रिया आहे.

मूर्धन्य गायक पं. मुकुल शिवपुत्र यांची प्रस्तावना या पुस्तकाला लाभली आहे. ते आपल्या प्रस्तावनेत म्हणतात, ‘कुमारजींच्या जीवनात जो सृजनाचा उपक्रम घडला, त्यात निर्मितीचे एकेक टप्पे समजून घेऊन त्या प्रक्रियेला मान्यता देऊन त्याप्रमाणे रागनिर्मितीचा रीतसर प्रयत्न कुमारजींनंतर सर्वप्रथम साधना शिलेदार यांनी केला आहे. लोकधुनेत जी स्वरावली आहे, जे स्वरसंवाद आहेत, ते म्युझिकली जेनुईन असले तर रागात प्रमाण होतात. लोकसंगीतात केवळ रागनिर्मितीची बीजे आहेत असे नसून त्यात शक्यताच शक्यता बीजरूपाने अस्तित्वात आहेत. लोकसंगीत सहज आहे तर राग संगीताला बौद्धिक आधार आहे.’

डॉ. शिलेदार यांनी मुंबई, खैरागड (छत्तीसगढ), तसेच केरळ, गोवा, कोकण, माळवा प्रांत (मध्यप्रदेश), झाडीपट्टी (गडचिरोली वा आसपास) येथे प्रत्यक्ष भेटी देऊन अथवा प्रत्यक्ष कार्यक्रम ऐकून लोकसंगीताचे स्वरूप, कार्य, पारंपरिकता, लवचीकता, प्रादेशिकता, मौखिक परंपरा, गीतातील लक्षणे व भेद या घटकांवर अभ्यासपूर्वक संशोधन केले. लोकधुनांची निरीक्षणे व नोंदी या पुस्तकात समाविष्ट केली. लोकसंगीताचा शोध घेत असताना लेखिकेने अनेक संगीतकारांची विधाने व त्यांची मते जाणून घेतली. पं. रविशंकर, डॉ. अशोक रानडे, पद्मश्री देविलाल सामर, पं. चंद्रशेखर रेळे, आचार्य विवेक गोखले, पं. भातखंडे अशा बुजुर्ग लोकांचे संपन्न

लेख अभ्यासले. या मतांचा यथायोग्य परामर्श त्यांनी घेतला आहे. ‘कुमार घराणे’ निर्माण होण्यापेक्षा ‘कुमार प्रभाव’ अधिक महत्त्वाचा कसा आहे हे लेखिकेने कुमार गायन शैलीबद्दल पेश केले आहे. कुमार गंधर्वांप्रति असलेला भक्तिभाव, समर्पित भाव, शोधक वृत्ती व मेहनत लेखनात आढळते.

डॉ. साधना शिलेदार यांचे हे तीनही धुनउगम राग युट्युबवर आपल्याला ऐकता येतात. त्यामुळे आपण या नवनिर्मितीचा प्रत्यय घेऊ शकतो. राग ‘ऋतू’ हा मध्य प्रदेशातील माळवा प्रांतात गायल्या जाणाऱ्या ‘परबतिया’ या लोकधुनेवरून निर्माण केला आहे. रागातील स्वर रे ग ध नी कोमल, दोन मध्यम, पंचम वर्ज्य, निषाद वक्र आहे.

सारेगम मेध नीध सां
सां धनीध मे म गरेग सा

पाठोपाठ येणाऱ्या दोन मध्यमांचा प्रयोग व स्वरवक्रता हे या धुनरागाचे वेगळेपण दर्शवते. बंदिशीचा अर्थ आणि स्वर योजना यात संवाद साधला आहे. त्यामुळे करुण रसनिर्मिती आकर्षून घेणारी आहे.

स्थायी
ज्येठ में अगनी जले सूरज से
सुखा कुवां, तापे धरती, पडा अकाल
अंतरा
सूखा पडा बोले बोले धरती
रितूआ, नेहा ला, मेहा ला

रूपक तालात बांधलेली ही बंदिश निसर्गाचे वास्तव रूप दाखवते.



लोकसंगीत सहज आहे.
रागसंगीताला अभ्यासाचे बौद्धिक
अधिष्ठान आहे. त्यांचे नाते कोणते?
ही प्रक्रिया उलगडून दाखवणारे पुस्तक.

लोकधुनांतून रागनिर्मिती

डॉ. साधना शिलेदार

किंमत : ₹ १३०/- । (ट.ख. ₹ ५०)

राग अनुप हा मध्यप्रदेशातील माळवा प्रांतात गायल्या जाणाऱ्या लोकधुनेवर आधारलेला आहे.

चलन
नी सा रे सा, सा ग म प म ग, रे ग म ग रे सा, ग रे नी
बंदिश
क्या भयो दिलडो उदास, म्हाने बतई दे,
का मन डरत है, काहुं की आस रहत है जिया में सदा
म्हाने बतई दे

या बंदिशीवर थेट लोकशैलीची छाया आणि कुमार शैलीचा प्रभाव आहे.

कोकण प्रांतात 'गुढूल्या गीत' हे लोकगीत गायले जाते. या लोकधुनेपासून 'गोधूलि' या रागाची निर्मिती केली. रागाची स्वरवैशिष्ट्ये म्हणजे पाठोपाठ लागणारे दोन धैवत, दोन मध्यम. अशा स्वरांचा प्रयोग यापूर्वी झाला नव्हता. हे या बंदिशीचे नावीन्यपूर्ण सौंदर्यस्थान आहे. यातला शुद्ध मध्यम प्रभावी आहे. गंधार कोमल व रिषभ शुद्ध आहे.

सा रे ग म, मे ध ध नि सां, सां नि ध, म मे ध, ध ध नि, धधमे म, ग रे सा

रागाच्या बंदिशी झपताल आणि दादरा यात बांधल्या आहेत.

दादरा (उपशास्त्रीय)
स्थायी
बादरवा कित गये


अभिनंदन!

उत्कर्ष मंडळ, विलेपार्ले (पूर्व) मुंबई



डॉ. केशव बळीराम हेडगेवार
ग्रंथगौरव पुरस्कार

**कट्टा मॉडेल**

डॉ. मिलिंद वाटवे



नाही सहे बिरहा तोरा अब
अंतरा
रूठो नाही, आन मिलो अब,
नाही सहे बिरहा तोरा अब

तिन्ही रागांतील बंदिशींची योजना भावपूर्ण व प्रासादिक आहे. डॉ. साधना शिलेदार यांनी धुननिर्मित नव्या रागांची निर्मिती करून कुमार गंधर्व यांच्या नवनिर्मितीचा सांगीतिक वारसा जपण्याचे मोलाचे कार्य केले आहे. हे कार्य भारतीय रागसंगीतात मोलाची भर घालणारे असल्याने निश्चितच अभिनंदनीय आहे.

***डॉ. शिल्पा बहुलेकर***


गेली चाळीस वर्षे दिलीप माजगावकरांनी विविध
नामवंतांशी केलेला चिंतनशील व भावगर्भ पत्रसंवाद,
त्यांची विस्तृत मुलाखत, तसेच
'दिगमा' या चतुरस्र व्यक्तिमत्त्वाला न्याहाळणारे
त्यांच्या सुहृदांचे लेख...



## पत्र आणि मैत्र

दिलीप माजगावकर

दिलीप माजगावकरांनी विविध प्रसंगी प्रकाशनासंबंधी,
साहित्यकृतींविषयी केलेल्या अनुभवसिद्ध
व रसाळ भाषणांचे संकलन आणि
त्यांनी आंतरिक जिव्हाळ्याने रेखाटलेली
अनेक सुहृदांची आशयसंपन्न व्यक्तिचित्रे...



## वाणी आणि लेखणी

दिलीप माजगावकर

दोन पुस्तकांच्या संचाची किंमत : ₹ १०००/-
(ट. ख. ₹ १००)




## गाऊ त्यांना आरती

‘भारतरत्न’ हा सर्वोच्च
नागरी सन्मान मिळवलेल्या
कर्तृत्ववंतांची ‘राजहंसी’ चरित्रे

## मदर तेरेसा

*मदर तेरेसा यांना १९८० साली ‘भारतरत्न’ या सर्वोच्च नागरिक सन्मानाने गौरवण्यात आले. आशा कर्दळे लिखित ‘मदर तेरेसा’ हे पुस्तक ‘राजहंस’ने प्रकाशित केले. त्यातील ‘गरिबांच्या नावाने नोबेल’ या प्रकरणातील हा संपादित अंश.*

साक्षात सोन्याच्या मुशीतून बाहेर पडलेला तो दिवस उजाडला. १९७९ साल. आजवर मिळालेल्या सर्व पुरस्कारांवर, पारितोषिकांवर आणि मानसन्मानांवर कळस चढवणारं वर्ष. मदर तेरेसांना त्या वर्षीचा नोबेल शांतता पुरस्कार जाहीर झाला होता.

स्वत: सिनेटर एडवर्ड केनेडींनी १९७५मध्येच मदर तेरेसांचं नाव या पुरस्कारासाठी अधिकृतरीत्या नामांकित केलं होतं. मार्टिन ल्यूथर किंग (ज्युनिअर), डॉ. अल्बर्ट श्वाइट्झर आणि अल्बर्ट जॉन लुटुली यांची परंपरा मदर तेरेसांनी समृद्ध केली.

या प्रतिष्ठित पुरस्काराचा स्वीकार करायला मदर ‘इन द नेम ऑफ द पुअर’ अशा विनम्र वृत्तीनं गेल्या. नॉर्वेजियन नोबेल कमिटीला धन्य वाटलं! जगात शांतता प्रस्थापित करण्याचा मार्ग फक्त राजकारणाचाच नसतो, मानवतेची सेवा हाच उलट राजमार्ग असतो हे डॉ. अल्बर्ट श्वाइट्झरप्रमाणे मदर तेरेसांनीही सिद्ध केलं होतं. त्यामुळे त्यांची निवड निर्विवाद आणि पारितोषिकाचीच शान वाढवणारी ठरली. कारण गेल्या काही वर्षांत हा बहुमान मिळालेल्या व्यक्ती राजकारणी नेते, पुढारी किंवा मुत्सद्दी होते. सतत ३१ वर्षं कलकत्त्याच्या झोपडपट्ट्यांमध्ये काम करणारी स्त्री नव्हती! भारतातल्या एकाच शहराचं नाव नोबेल पुरस्कारासाठी दुसऱ्यांदा जोडलं गेलं. या सुदिनाचं स्वप्न नियतीलाही पडलं नसावं.

नॉर्वेचे राजे, नॉर्वेजियन नोबेल कमिटीचे अध्यक्ष प्रो. जॉन सेन्स, देशोपदेशीचे उच्च पदाधिकारी, मुत्सद्दी, विचारवंत यांच्या उपस्थितीत एका लहानखुऱ्या, कृश, खादीधाऱ्या मदरनी जेव्हा एक लाख नव्वद हजार डॉलर्सचा तो पुरस्कार स्वीकारला,

तेव्हा टाळ्यांचा गगनभेदी कडकडाट खूप वेळ होतच राहिला!

प्रो. जॉन सेन्स यांचं भाषण हेलावून टाकणारं होतं. ते म्हणाले, ‘‘गरिबांचा व्यक्तिश: आदर हे मदर तेरेसांच्या कार्याचं गमक आहे. इतरांना नको झालेल्यांना हृदयाशी धरणं हा त्यांचा आणि त्यांच्या सिस्टर्सचा धर्म आहे. जेव्हा बाकी लोक गिऱ्हाइकं आणि खरीददार शोधायच्या मागे असतात, तेव्हा त्या समानधर्मी सहकाऱ्यांचा शोध घेत असतात. त्यांच्या आजपर्यंतच्या दारिद्र्याला वाहिलेल्या लांब आयुष्यात सुख आणि बाह्य आनंदाला थाराच नव्हता. पण म्हणूनच ते आयुष्य सर्वाधिक मौलिक ठरलं. जगात शांतता प्रस्थापित करायचा त्यांचा मार्ग सर्वांत मूलभूत आहे आणि तो म्हणजे माणसाला प्रेम, आरोग्य, अन्न, वस्त्र आणि निवारा देणं.’

त्यानंतर मदर तेरेसा बोलायला लागल्या. त्या म्हणाल्या, ‘व्यक्तिश: मला असं वाटतं की, मी या पुरस्कारासाठी पात्र नाही. पण माझ्या गरिबांच्या वतीनं मी त्याचा स्वीकार करते. मला हा पुरस्कार देऊन नोबेल कमिटीनं एक प्रकारे गरीब देशांचाच गौरव केला आहे. जगातल्या गरिबांना मान्यता मिळाली आहे.

‘आपण या जगात प्रेम करायला आलो आहोत. एक वेळ पोटाची भूक भागवता येईल, पण प्रेमाची भूक भागणं फार कठीण. आपल्या कुटुंबातच अशी एखादी व्यक्ती असेल, जी प्रेमाची भुकेली असेल. घरातून सुरू झालेलं प्रेम जगभर पसरू शकेल.

‘शांतता तरी का नष्ट होते? माणसाच्या किमान गरजाही पूर्ण होऊ शकत नाहीत, म्हणून. आज जगभरात लाखो मुलं मरताहेत. अनेक कारणांनी. भूक, दैन्य; पण सर्वांत खेदजनक गोष्ट कोणती असेल तर स्वत: आईच मुलाला ठार करते. यापुढे आणखी काय शिल्लक उरतं?

‘मला माझ्या गरिबांनी आणि अनाथांनी अमाप प्रेम दिलं आहे. तुम्हीही तुमच्या देशापासून सुरुवात करा. गरीब शोधा आणि प्रेम करायला लागा. तुम्ही कधी भूक




मिस्कील आणि मनस्वी. प्रेमळ आणि फटकळ.
नर्मविनोदी आणि स्पष्टवक्ती.
आग्रही आणि पारदर्शी.
सईच्या व्यक्तिमत्त्वाचे विविध पैलू
उलगडणारे आत्मकथन!

**सय** माझा कलाप्रवास

सई परांजपे

आवृत्ती सहावी । किंमत : ₹ ४५०/- । (ट.ख. ₹ ५०)

जवळून पाहिली आहे की नाही मला माहीत नाही. मी ती पाहिली आहे. भूक शरीरावर, डोळ्यांतून फार दारुण तऱ्हेनं व्यक्त होते. अशांच्या तोंडी एक घास घातला, तरी ते लोक जन्मभर पुरेल इतकं प्रेम मला देतात. त्यांच्याजवळ मला द्यायला कोणतीही वस्तू नाही हे माझं केवढं भाग्य!

'छोटंसं हसू. मनापासून आलेलं. ती प्रेमाची सुरुवात असते. या हसण्यानं आपण स्वत:चं आणि दुसऱ्याचं आयुष्य सुखी करू शकतो. कुटुंबातसुद्धा एकमेकांना असं प्रेमाचं हसू द्या. जीवन सुंदर होऊन जाईल. 'मी इतर कुणाला नको असलो तरी देवाला हवा आहे' असा दृढ विश्वास ठेवला किंवा वंचितांच्या मनात निर्माण केला की, दु:खं आपोआप कमी होतात.



किंमत : ₹ १४०/- । (ट.ख.₹ ५०)

'नोबेल प्राइझ ही नॉर्वेजियन लोकांनी मला दिलेली सुंदर भेट आहे. या रकमेतून मी घरं नसलेल्या लोकांसाठी घरं बांधून घेणार आहे. प्रेम घरापासूनच सुरू होतं अशी माझी श्रद्धा आहे. घरच नसेल तर प्रेम कुठून येणार? म्हणूनच गरिबांना घरं द्यायची.

'जगभर केवळ गरीब देशातच नव्हे, तर पाश्चिमात्य देशांमध्येही मला दूर करायला अतिशय अवघड अशी गरिबी आढळली. रस्त्यावरच्या एखाद्या उपाशी भिकाऱ्याला उचलून आणून मी त्याला बशीभर भात देते, तेव्हा त्याची भूक मिटते. पण जी व्यक्ती नकोशी आहे, एकटी आहे, समाजानं जिला टाकून दिलेलं आहे त्या व्यक्तीची गरिबी फार क्लेशकारक आहे. आमच्या सिस्टर्स पश्चिमेकडच्या देशांमध्ये अशा व्यक्तींसाठी काम करत आहेत.'

सर्वांची हृदयं जिंकून मदर तेरेसा कलकत्त्याला परतल्या. आता पुन्हा मूळ कामाकडे वळणार, इतक्यात महत्त्वाची बातमी येऊन थडकली. भारत सरकारनं आपला सर्वोच्च बहुमान 'भारतरत्न' मदरना देण्याची घोषणा केली! भारतात न जन्मलेल्या, पण तनामनानं भारतीय झालेल्या व्यक्तीला हा सन्मान प्रथमच मिळत होता. मदरना मिळालेल्या पद्मश्रीप्रमाणेच.

२२ मार्च १९८० या दिवशी राष्ट्रपती नीलम संजीव रेड्डी यांनी राष्ट्रपती भवनातल्या अशोक हॉलमध्ये हा किताब मदरना अर्पण केला. तेव्हा भारतीयांच्या मनात मदरविषयी किती आदर आहे, याचंच प्रत्यंतर आलं.

❖

अभिनंदन!

## महाराष्ट्र फाउंडेशन, अमेरिका



ललित साहित्यासाठीचा
ग्रंथ पुरस्कार (२०२४)

**धरणसूक्त**

◆

विलास शेळके



---



वैचारिक साहित्यासाठीचा
ग्रंथ पुरस्कार (२०२४)

**माणूस 'असा' का वागतो?**

◆

अंजली चिपलकट्टी



अभिनंदन!

## दि गोवा हिंदू असोसिएशन

सर्वोत्कृष्ट अनुवादासाठी
डॉ. सुभाष भेंडे पुरस्कृत
प्रा. जी. ए. कुलकर्णी पुरस्कार



**राखेतून उगवतीकडे**

◆

विंग कमांडर अशोक लिमये
अनु. : सोनाली नवांगुळ





# चित्र पाहीन आवडी

## अभिव्यक्त होण्यासाठी कला

तर सीन असा...

एक व्हिडिओ भिंतीवरील पडद्यावर चालू आहे. एक तरुण संपूर्ण विवस्त्र स्त्री कलाकार आपल्या हाताने आपल्या शरीराला चिकटपट्टीने आवरण करीत आहे, आवृत करीत आहे. उजव्या हाताने डाव्या हाताला चिकटपट्टी लपेटत आहे. असे अनेक व्हिडिओ आणि काही फोटो दालनात प्रदर्शित केले आहेत. असा कलात्मक एकएक धक्का पचवत सामान्य प्रेक्षक पुढे सरकतात.

एका मोठ्या छापील फोटोत अनेक वंशांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या, विविध पद्धतींचे समुद्रकिनाऱ्यावर वापरायचे आधुनिक पोशाख केलेल्या समूहाचा किनाऱ्यावरील फोटो छापलेला आहे. बराच बोलका फोटो.

दुसऱ्या एका चित्रफितीत बहुधा आफ्रिका खंडातील पारंपरिक सजावट केलेल्या, प्रिंटेड कापडाचे कपडे परिधान केलेल्या महिला लहान रस्त्यावरून बाजूबाजूने मोठे जड आणि जाड क्यान पायाने आणि हाताने दोरी बांधून ओढत आहेत. दमत आहेत, थकत आहेत, दम खाऊन पुढे जात आहेत. एकूणच समाजाने लादलेले स्त्रीत्वाचे ओझे ओढत आहेत का काय असा भास व्हावा, असे चित्रण.

एका सचित्र (animated) चित्रफितीत महिला जणू यंत्र आहे असे भास आणि आभास दाखवले आहेत. नानाविध हालचाली आणि दिवसभराची कामे आणि विविध भूमिका वठवणारी अत्याधुनिक स्त्री.

एका फोटोत काळ्या धार्मिक बंधन असलेल्या पोशाखधारी स्त्रीचे हात लक्ष वेधून घेतात. बॉक्सिंगचे लाल रंगाचे ग्लव तिने परिधान केलेले आहेत. जणू ती अनाम स्त्री आत्मरक्षण करण्याची ताकद प्रतीत करीत आहे. असे काहीसे भाव...

आणखी एका चित्रात there is no border here असे लिहिलेल्या पिवळ्या चिकटपट्ट्या वापरून निर्मिलेली एक कलाकृती आहे. स्त्रीची देहप्रतिमा न वापरता केलेली प्रभावी अभिव्यक्ती असे वर्णन करता येईल.

अशा ह्या विदेशी कलावंत आणि त्याबरोबर स्त्रीवादी भारतीय कलावंत अशी एकत्र मांडणी प्रदर्शनात आहे.

पुष्पमाला एन. ही आघाडीची समकालीन भारतीय कलावंत. लोकाभिमुख प्रसिद्ध कलाकृती घेऊन नाट्य पद्धतीने ती विशेष पोशाख आणि केशभूषा करते आणि प्रसंग

सादर करते. ह्या सादरीकरणाचा फोटो घेते आणि तो भव्य आकारात प्रिंट करते. सदर प्रदर्शनात तिने रविवर्माच्या चित्रातील प्रसिद्ध कालीचे रूप वठवले आहे. त्यात पुष्पमाला न दिसता काली दिसते. ह्यात स्त्रीची पारंपरिक लोकधारणेतील ताकद आणि शक्ती प्रतीत होते. भव्यतेमुळे आणि फोटो तंत्रामुळे प्रसंग वास्तव आहे असे भासते आणि ते चित्र मनावर परिणाम करते.

मिथु सेन ही आणखी एक भारतीय चित्रकार ह्या प्रदर्शनात सहभागी आहे. तिचे चित्र काही मजकुरामुळे प्रश्न उपस्थित करते. आपण पाककृती पाहतो तसे कलावंत म्हणून नामवंत होताना काय कृती करावी लागते? स्त्री असणे म्हणून काय करतात. ...अशा बाबत मिथु भाष्य करते.

'एंपॉवरमेन्ट : आर्ट अँड फेमिनीजम' असे ह्या आगळ्यावेगळ्या प्रदर्शनाचे नाव आहे. पुणे शहरात २०२४च्या ऑक्टोबर महिन्यात द बॉक्स ह्या ठिकाणी आपण 'अभिव्यक्त होण्यासाठी कला' हा कलेचा उद्देश स्पष्ट दाखवणारे हे आंतरराष्ट्रीय प्रदर्शन मॅक्सम्युलर भवन यांचेतर्फे आयोजित झाले आहे.

हे संपूर्ण प्रदर्शन म्हणजे 'अभिव्यक्त होण्यासाठी कला' हा कलानिर्मितीचे उद्देश दाखवणारे चांगले उदाहरण होय. सदर दृष्टीने मांडलेले हे महत्त्वपूर्ण प्रदर्शन होय. 'एंपॉवरमेन्ट ऑफ विमेन' असे आपण सारखे ऐकतो. एकूणच 'कला आणि स्त्रीवाद' असे त्याचे मिश्र स्वरूप आहे.

कला इतिहासाचा विचार करता सुरुवातीला फक्त पुरुष चित्रकार मंडळी यांच्याविषयी लिहिले गेले. एकदा समाजाने स्त्री चित्रकार हा विचार स्वीकारला की मग लेडी मायकेलँजेलो कोण? अशांसारखे प्रश्न साधे-सोपे होत जातात.

१९६०च्या उत्तरार्धात अमेरिकेतील युद्धविरोधी निदर्शने आणि जगभरातील लिंग, नागरी हक्कांच्या चळवळींच्या दरम्यान पश्चिमेतील स्त्रीवादी कला चळवळीचा उदय झाला. विसाव्या शतकाच्या सुरुवातीच्या आधुनिकतावादी चळवळींच्या युटोपियन आदर्शांकडे परत येताना, स्त्रीवादी कलाकारांनी खोट्या पुरुषप्रधान कला इतिहासाचे पुनर्लेखन करण्याचा, त्यांच्या कलेद्वारे त्यांच्या सभोवतालचे समकालीन जग बदलण्याचा, प्रस्थापित कलाविश्वात हस्तक्षेप करण्याचा आणि विद्यमान कलेला आव्हान देण्याचा प्रयत्न केला. स्त्रीवादी विचाराने महिला आणि अल्पसंख्याक कलाकारांसाठी पूर्वी अस्तित्वात नसलेल्या संधी आणि जागा निर्माण केल्या, तसेच १९८०च्या दशकातील ओळख आणि कार्यकर्ता कला प्रकारांसाठी मार्ग मोकळा केला.

तथापि, अनेक देशांतील महिला कलाकारांचे योगदान आणि प्रभाव दुर्लक्षित केले जाऊ नये, जसे की जर्मन दादावादी हन्ना होच आणि मेक्सिकन अतिवास्तववादी प्रसिद्ध चित्रकार फ्रिडा काहलो, ज्यांच्या शक्तिशाली कामांनी सुरुवातीपासूनच जगभरातील स्त्रीवादी कलाकारांसाठी प्रेरणास्त्रोत म्हणून काम केले आहे.



स्त्रीवादी कलाकारांनी प्रेक्षक आणि कलाकृती यांच्यात महिलांच्या दृष्टीकोनाच्या समावेशातून संवाद निर्माण करण्याचा प्रयत्न केला. कला ही केवळ सौंदर्याची प्रशंसा करण्याची वस्तू नव्हती, तर ती सामाजिक आणि राजकीय परिदृश्यावर प्रश्न विचारण्यासाठी दर्शकांना प्रवृत्त करू शकते आणि या प्रश्नाद्वारे, जगावर परिणाम करू शकते आणि समानतेकडे बदल घडवून आणू शकते. कलाकार सुझान लेसीने घोषित केल्याप्रमाणे, स्त्रीवादी कलेचे उद्दिष्ट 'सांस्कृतिक मनोवृत्तींवर प्रभाव पाडणे आणि रूढीवादी कल्पनांचे रूपांतर' हे होते.

'अभिव्यक्त होण्यासाठी कला' समोर ठेवून एक चित्राचे उदाहरण पाहू या. कदाचित आपला कमी गोंधळ होईल. १९७२ मध्ये मेरी बेथ एडल्सन हिने काही आज कार्यरत अमेरिकन महिला कलाकारांचे फोटो घेऊन 'लास्ट सपर' कलाकृती केली. लिव्हिंग अमेरिकन महिला कलाकार/लास्ट सपर नावाचा कोलाज तयार केला. लिओनार्डो दा विंची याच्या चित्रकलेवर आधारित, तिने शिष्यांच्या चेहऱ्याच्या जागी महिला कलाकारांचे चेहरे बदलले, त्यांपैकी योको ओनो, लुईस बुर्जुआ आणि हेलन फ्रँकेंथलर. येशूच्या जागी जॉर्जिया ओ'कीफे आहे. हे काम एक प्रसिद्ध पोस्टर बनले, जे कलाविश्वातील दुराचाराशी लढा देणाऱ्यांसाठी मोठ्या प्रमाणावर वितरित आणि सुप्रतिष्ठित झाले.

वर वर्णन केलेलं प्रदर्शन हे ह्या साऱ्या चळवळीचे आजचे प्रभावी रूप होय.

समानता आणि अत्याचार रोखणे ही आपली आजची आव्हाने आहेत.

नाइलाजाने खरे तर आपली वृत्तपत्रे रोजच ह्याबाबत काही ना काही माहिती देतच असतात. कलकत्ता येथे नुकतीच झालेली निवासी डॉक्टर बलात्कार-खुनाची घटना आणि एके काळी पुरोगामी असलेल्या महाराष्ट्रात घडलेली बदलापूर घटना आपल्याला अस्वस्थ करतात. म्हणूनच ‘अभिव्यक्त होण्यासाठी कला’ हे एक परिवर्तनाचे परिणामकारक हत्यार होऊ शकते असे लक्षात येते. ‘एंपॉवरमेन्ट : आर्ट अँड फेमिनीजम’ ह्यासारखी प्रदर्शने आपण कला समजून घेण्याच्या प्रवासात आवर्जून पाहिली पाहिजेत.

**_नितीन हडप,_** ९३७२४१८६१५

अभिनंदन!

## महाराष्ट्र ग्रंथोत्तेजक संस्था



कै. महादेव बळवंत नातू
पारितोषिक

**विंदांचे गद्यरूप**

◆

सुधीर रसाळ




अभिनंदन!

## निर्मला मठपती फाउंडेशन, सोलापूर



राज्यस्तरीय सर्वोत्कृष्ट कादंबरीचा
द्वितीय पुरस्कार

**डोईचा पदर आला खांद्यावरी...**

◆

डॉ. छाया महाजन





# असे जन्मले पुस्तक!

## आबली

वाघोशी (ता. खंडाळा, जि. सातारा) या माझ्या गावापासून माझा लेखनप्रवास सुरू झाला होता. गावात सतत पडणारा दुष्काळ, शेतीतील अतिशय तुटपुंजे उत्पन्न, त्यातून घरात निर्माण झालेली आर्थिक विवंचना, कर्जबाजारीपणा अशा अस्वस्थपणाचा माझ्या कुटुंबासाठीचा दहा वर्षांचा हा काळ. या काळातील इयत्ता अकरावी - बारावीच्या दिवसांत वाचनालयांतील पुस्तकांचे वाचन करत राहिलो, वाचनातून मी माझ्या जगण्याचे संदर्भ शोधत राहिलो. छोट्या-छोट्या लेखनातून व्यक्तही होऊ लागलो. हे लेखन वृत्तपत्रांतून प्रसिद्ध होऊ लागलं. वाचनामुळे व सभोवतालच्या परिस्थितीमुळे एक दृष्टीकोन मिळत होता. नोकरीनंतर हा दृष्टीकोन आणि अनुभवाच्या कक्षा रुंदावू लागल्या. मग पुढे यातूनच कथालेखन सुरू झाले. आबली पुस्तकाच्या जन्माची ही होती प्रारंभिक अवस्था.

आबली या कथासंग्रहामध्ये एकूण सात कथा आहेत. या पुस्तकाचा आणि एकूणच प्रत्येक कथेच्या निर्मितीचा अनुभव वेगळा होता. या पुस्तकातील 'बैजी' ही कथा वगळता इतर कथा वयम्, किशोर, ऋग्वेद या प्रसिद्ध मासिकांत प्रकाशित झाल्या होत्या. राजहंस प्रकाशनाने या सर्व कथांचा कथासंग्रह 'आबली' या नावाने प्रकाशित केला आहे.




किंमत : ₹ १७०/- । (ट.ख. ₹ ५०)

शाळेतून घरी जाताना जोराचा पाऊस सुरू झाला. मी आडोशाला उभा राहिलो. मेंढपाळांचं घोड्यावर लादलेलं बिऱ्हाड पावसात पूर्ण भिजलं होतं. यात घोड्यावर बसलेली चिमुकली मुलं तसेच महिला भिजल्या होत्या. त्याच्यातच असलेली एक मुलगी मला दिसली. मी बराच वेळ ते जगणं पाहत होतो. तिथंच कथा सुचली, आबली!

शाळा, शिक्षण व स्वत:चा मुलूख यांच्यापासून दूर जाऊन पोटासाठी शेकडो मैलांची पायपीट करणारं खडतरपणाचं हे

जगणं मी मांडत गेलो. माझे आजी-आजोबा आणि माझ्या वाघोशी गावातील बरीच माणसं मेंढरांसाठी रायगड जिल्ह्यात पायपीट करत जायचे. रविवारी सुट्टीच्या दिवशी मी मेंढपाळांच्या बिऱ्हाडांना भेटी द्यायचो, कुटुंबातील तसेच गावातील लोकांसोबत चर्चा करायचो. अनुभवलेलं, पाहिलेलं जगणं मी कथेत उतरवत गेलो. शाळा व शिक्षकांना खूप घाबरणारी पण संवेदनशील शिक्षकाच्या लळ्यामुळे शाळेत दाखल झालेली, रमलेली आबली जेव्हा परिस्थितीमुळे शाळाबाह्य होते, तेव्हा तिचा प्रवास वाचकांना चटक लावणारा आहे.

आबलीप्रमाणेच आकाशकंदील ही कथादेखील मेंढपाळांच्या जीवनावर आधारित आहे. दिवाळीचा सण सर्वत्र असताना आपल्या बिऱ्हाडावरपण दिवाळी साजरी व्हावी, त्यासाठी आकाशकंदील तयार करावा अशी अतिशय माफक इच्छा असणारा भिवा या कथेचा कथानायक आहे. आहे त्या परिस्थितीला सामोरं जात स्वत:चा आनंद शोधणारा भिवा वाचकांना भावतोय.

भाकरीचा चंद्र शोधण्याची लढाई रोज चिवटपणे लढणाऱ्या कातकरी बांधवांच्या जगण्याचा संघर्ष झिंगऱ्या कथेतून मी मांडला आहे. दिवाळीला नवीन शर्ट विकत घेता यावा यासाठी झिंगऱ्या खूप मासळी पकडतो, पण शेवटच्या क्षणाला त्याचं स्वप्न भंग होतं. परिस्थितीपुढे हतबल न होता पुन्हा नव्यानं उभा राहणारा झिंगऱ्या वाचकांच्या पसंतीस उतरत आहे.

कोल्हापूर येथील एका वाचकानं फोन केला. त्यांचा ऊस जळाला होता. झिंगऱ्या कथा वाचून ते वाचक म्हणतात, 'माझा एकरभर ऊस जळालाय, पण तुमची झिंगऱ्या कथा वाचल्यावर असं वाटलं की, माझं काहीच नुकसान झालं नाही. झिंगऱ्या जसा जगण्याच्या लढाईसाठी उभा राहिला, तसाच मीदेखील पुन्हा उभा राहीन.'

एखाद्या समाजघटकाच्या जगण्याचा आत्मा त्याच्या बोलीभाषेतून जाणवतो, म्हणून



उत्साह देणाऱ्या दिवसाला पाहून अंधाराला काय वाटतं? वर्षानुवर्षं एकाच जागी साचलेल्या तळ्याचं आयुष्य कसं आहे? जंगलं कमी झाल्यामुळे घर हरवलेल्या प्राण्यांना काय वाटतं? पशू-पक्षी संपावर गेले तर काय होईल? या कविता वाचून अशा प्रश्नांची काय उत्तरं मिळतायत पाहू या-

प्रेम करू या पृथ्वीवर

वर्षा गजेंद्रगडकर

किंमत : ₹ १२०/-

या पुस्तकातील कथांमध्ये मावळमुलुखातील मावळी बोलीभाषा, कातकरी बोलीभाषा तसेच मेंढपाळांची बोलीभाषा अशा विविध बोलीभाषा या कथांमध्ये आढळतात.

या पुस्तकातील कथानायक असलेली सर्व मुलं विविध सामाजिक स्तरांतील आहेत. आयुष्याकडून त्यांच्या अपेक्षा अतिशय माफक आहेत. या गोष्टींसाठी ते परिस्थितीसमोर हार न मानता किंवा नाउमेद न होता संघर्ष करतात.

मी जिल्हा परिषदेच्या शाळेत प्राथमिक शिक्षक म्हणून कार्यरत आहे. मुलांना संवेदनशीलपणे समजून घेणं आणि त्यांच्यासाठी प्रभावी सुलभकाची भूमिका निभावणं या भूमिकेतून या कथांतील शिक्षक व्यक्तिरेखा अस्तित्वात आलेल्या आहेत. या शिक्षक व्यक्तिरेखा काल्पनिक तर अजिबात नाहीत. कारण शाळांमध्ये अतिशय उत्कृष्ट कार्य करणारे अनेक ध्येयवेडे शिक्षक महाराष्ट्रात आहेत. कथासंग्रहातील आबली, डूल, आकाशकंदील, बैजी या कथा शिक्षणाच्या अंगानं लिहिलेल्या आहेत.



माझं हे पहिलंच पुस्तक निर्मितीच्या प्रत्येक टप्प्यावर खूप मेहनत घेऊन राजहंस प्रकाशनाने देखण्या स्वरूपात साकारलं आहे. याबद्दल संपादक दिलीप माजगावकर सर, डॉ. सदानंद बोरसे सर, वर्षा गजेंद्रगडकर, तृप्ती देशपांडे, सारिका भामे व संपूर्ण राजहंस टीमचे तसेच अक्षरधारा परिवाराचे रमेश राठिवडेकर सर यांचे मनापासून आभार.

भविष्यातील लेखन प्रवासाच्या वाटचालीत आबली पुस्तक माझ्यासाठी महत्त्वाचा टप्पा असेल.

आबली पुस्तकाविषयी वाचकांच्या प्रतिसादाबद्दल सदैव उत्सुकता असेलच.

***प्रमोद प्रकाश धायगुडे***

स्थलांतर करू पाहणाऱ्या पक्ष्यांच्या एका थव्याला
प्रवासामध्ये अनेक अडचणींना सामोरे जावे लागते.
एका टप्प्यावर प्रत्यक्ष नेत्याचे नीतिधैर्य संपते.
नेताहीन थवा दिशाहीन होऊन विखुरतो,
प्रवासात शिकून शहाणा होत असलेला एक
लहान पक्षी त्याला धीर देतो. त्याची गोष्ट सांगणारे -

नंदनवन (संगीत-नृत्य-नाट्य)

माधव वझे

किंमत : ₹ ५०/- । (ट.ख. ₹ ५०)



# राजहंसी मोहोर : ऑडिओ पॉडकास्ट

**१. दुर्दम्य : भारतीय सेनाधिकाऱ्यांच्या शौर्यगाथा** - मेजर जन. शशिकांत पित्रे (निवृत्त)

दुर्दम्य इच्छाशक्ती असेल तर अशक्यप्राय उद्दिष्टंही गाठता येऊ शकतात. मेजर जनरल शशिकांत पित्रे (निवृत्त) लिखित 'दुर्दम्य' हे पुस्तक म्हणजे सैन्यातील उत्तुंग नेतृत्वाची आणि विलक्षण शौर्याची जणू सोनेरी पानं!

**२. प्रिय पालक : पालकत्वाचं परफेक्ट गाईड** - डॉ. वैशाली देशमुख

अडनिड्या वयात मुलं जेवढी भांबावलेली असतात ना, त्याही पेक्षा आपलं मूल असं का वागतंय या आणि अशा अनेक प्रश्नांनी गोंधळलेल्या पालकांना एका फ्रेंड, फिलॉसॉफर, गाईडची गरज असते. जरूर ऐका नि वाचा.

**३. दिलीप प्रभावळकर आणि विजय केंकरे यांची इरसाल पत्रापत्री**

ज्येष्ठ अभिनेते-लेखक दिलीप प्रभावळकर यांनी आपल्या तिरकस लेखणीतून साकारलेल्या 'पत्रापत्री' या आगळ्यावेगळ्या पुस्तकाविषयी जाणून घेऊ या दस्तुरखुद्द प्रभावळकर आणि लेखक, दिग्दर्शक, अभिनेते विजय केंकरे यांच्याकडून.

**४. दहावी-बारावीनंतरचे करिअर पर्याय** - डॉ. श्रीराम गीत

विद्यार्थ्यांनी शिक्षणाची वाट निवडताना ती केवळ मार्कांवर ठरवावी की आपला कल-आवड आणि क्षमता यांचाही आढावा घ्यावा? यांसारख्या सगळ्या कळीच्या प्रश्नांची उत्तरं जाणून घेऊ या प्रसिद्ध लेखक, डॉक्टर आणि करियर कौन्सेलर डॉ. श्रीराम गीत यांच्याकडून.

**५. सवाष्ण : वाड्याच्या गूढ गर्भात** - डॉ. क्षमा शेलार

वाड्याच्या भग्न भिंती, पुसट झालेली भित्तिचित्रं, अंधारा निमुळता जिना, चौकातली दगडी फरसबंदी आणि एका खोलीत कोंडलेली भ्रमिष्ट व्यक्ती. रहस्य, गूढ, भयरसांनी युक्त अशी ही राजहंस प्रकाशनाच्या रहस्य सन्मान कादंबरी स्पर्धा विजेती कादंबरी.

**६. वर्धापन आणि वारसा राजहंसचा**

मराठी साहित्यविश्वात मोलाचं योगदान नोंदवत असलेल्या, मराठी साहित्यातल्या गोल्डन पिरियडचं साक्षीदार असलेल्या, आणि ताज्या दमाच्या लेखकांकडून आजही अविरतपणे उत्तम साहित्याची निर्मिती करत असलेल्या राजहंस प्रकाशनाचा १ जून हा वर्धापनदिन. शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे आणि श्री. ग. माजगावकर यांनी १९५२मध्ये म्हणजेच बरोबर ७२ वर्षांपूर्वी राजहंसची स्थापना केली. सात दशकांहून अधिक गौरवशाली वारसा लाभलेल्या या राजहंसी वाटचालीविषयी जाणून घेऊ या राजहंस प्रकाशनाचे संचालक दिलीप माजगावकर आणि डॉ. सदानंद बोरसे यांच्याकडून.

**७. निसर्ग शब्दबद्ध करणारा अवलिया** - दिलीप कुलकर्णी

निसर्ग-पर्यावरण यांचा सखोल अभ्यास करताना केवळ भाषण-लेखनानं भागणार नाही, आपण तसं जगायलाही हवं असं तीव्रतेनं जाणवल्यामुळे १९९३ साली त्यांनी पुणं-पुण्यातली उत्तम नोकरी हे सगळं कायमचं सोडलं. कोकणातल्या एका खेड्यात जाऊन ते कुटुंबासह स्थायिक झाले. गेली ३१ वर्षं निसर्गस्नेही जीवनाचा ध्यास पुढे नेतानाच लिखाणाचा वसाही ते नेटानं पुढे नेत आहेत. प्रसिद्ध लेखक आणि पर्यावरण अभ्यासक दिलीप कुलकर्णी यांच्या ३८ वर्षांच्या लेखनप्रवासाविषयी आणि त्यांच्या विलक्षण जगण्याविषयीही जाणून घेऊ या.

**८. आर्थिक गुन्हेगारांच्या मागावर** - अपूर्वा प्रदीप जोशी

'दुनिया झुकती है, बस झुकानेवाला चाहिये', या म्हणीचा तंतोतंत अनुभव आपल्याला दिला नीरव मोदी, मेहुल चोक्सी, हर्षद मेहता, केतन पारेख अशा कैक महाठगांनी आणि एन्रॉन, व्हिडिओकॉन अशा लबाड कंपन्यांनी. त्यामुळेच प्रश्न पडतो की हे आर्थिक घोटाळे नेमके घडतात कसे आणि तितकंच महत्त्वाचं म्हणजे त्यांचे सूत्रधार शोधतं कोण? डॉ. अपूर्वा प्रदीप जोशी लिखित 'आर्थिक गुन्हेगारीचं

अंतरंग' हे नवीन पुस्तक फायनान्शियल फ्रॉड्सचं विलक्षण गुंतागुंतीचं विश्व उलगडतं. जाणून घ्या याविषयी.

**९. सायबर ॲटॅक्सचा थरारक मागोवा** - डॉ. संजय तुंगार / सुधीर साबळे

सायबर क्राईम्स हे नुसते आपल्या दारापर्यंत येऊन थांबले नाहीयेत तर खिशातल्या स्मार्टफोनमुळे शब्दशः एका क्लिकवर आले आहेत. ऑनलाईन विश्वातल्या या स्मार्ट चोरांचा सामना कसा करायचा असं विश्व उलगडतं. हे जाणून घ्या या पुस्तकातून.

**१०. अबला नव्हे सक्षम सीतेची कथा - अभिराम भडकमकर**

सीतेच्या अप्रकाशित तेजस्वितेवर प्रकाश टाकणाऱ्या लेखक, अभिनेते अभिराम भडकमकर लिखित सीता या कादंबरीची ही ओळख.

**११. औरंगजेब, दरोडा आणि आर्टिफिशियल इंटेलिजन्स! १६९५** - सुरेश वांदिले

धूर्त, कपटी, संशयी अशा विशेषणांनी ओळखल्या जाणाऱ्या औरंगजेब बादशहाला १६९५ साली एका ब्रिटिश समुद्री दरोडेखोरानं मोठाच गंडा घातला. औरंगजेबाच्या मालकीचं गंज-ई-सवाई हे अवाढव्य जहाज त्या वर्षी लुटण्यात आलं होतं. विशेष म्हणजे औरंगजेबानं जंग जंग पछाडूनही तो त्या दरोडेखोरापर्यंत शेवटपर्यंत पोचूच शकला नाही. हा जिव्हारी लागलेला अपमान विसरत औरंगजेबानं या दरोड्याचा तपास का थांबवला असेल, याचा शोध म्हणजे ही कादंबरी.

**१२. रोहिणी निरंजनी :** कथक गुरू रोहिणी भाटे जन्मशताब्दी विशेष - वंदना बोकील-कुलकर्णी

ज्या भूभागात यापूर्वी कधीही नृत्य नव्हतं, तिथे भगीरथ प्रयत्नांनी कथकनृत्य प्रस्थापित-प्रतिष्ठित करणाऱ्या, परंपरेची, अभिजाततेची मूल्यं उजागर करणाऱ्या, पारंपरिक कथक नृत्यकलेला कालसमांतर आशयाची संपन्नता बहाल करणाऱ्या रोहिणीताईंनी कलेचं उच्च स्तरावरचं व्यापक, सखोल, सौंदर्यशाली वैभव दाखवलं. 'जाणिजे यज्ञकर्म' या भावनेनं हा नृत्ययज्ञ त्यांनी आयुष्यभर श्रद्धापूर्वक केला. त्यांच्या प्रातिभ कलाजीवनाचा वेधक पट म्हणजे 'रोहिणी निरंजनी'.

**१३. Literary Tale of TV and Soap Operas -** Mugdha Godbole

आजवर एकदाही टीव्ही पाहिला नाही असा मनुष्य शोधून सापडणार नाही. त्यात तो मराठी असेल तर एकही मालिका कधी बघितली नाही असा माणूस मिळणार नाही. त्यामुळेच आठवड्याचे पाच-सहा दिवस दररोज न चुकता टीव्हीवरील दिसणाऱ्या मालिका नेमक्या उभ्या कशा राहतात, त्या चालतात कशाच्या जोरावर आणि इतक्या मोठ्या उद्योगाची पडद्यावरची तसंच पडद्यामागची सूत्रं हलवतं कोण याचा रंजक आढावा मुग्धा गोडबोले यांनी 'टीव्ही, मालिका आणि बरंच काही!' या त्यांच्या नवीन पुस्तकातून घेतला आहे.

**१४. Story of a Real-life Phoenix who Rose from the Ashes** - Sonali Navangul **-** Wing Cdr Ashok Limaye - सोनाली नवांगुळ

ही कहाणी आहे किशोरवयापासून जपलेल्या एका स्वप्नाची. त्यासाठी केलेल्या अपार शारीरिक, शैक्षणिक आणि मानसिक तयारीची, कष्टसाध्य यशाची, निष्ठेची आणि कर्तव्यबुद्धीची. पण.... एका क्षणात ती होते, कहाणी स्वप्नभंगाची आणि यातनांची. त्याच वेळी सोशिकतेची, दुर्दम्य इच्छाशक्तीची आणि समंजस स्वीकाराची. ही कहाणी केवळ आकाशात भरारी घेणारा वैमानिक कायमसाठी चाकाच्या खुर्चीत जखडबंद होतो त्याची नाही, तर पुनश्च 'राखेतून उगवतीकडे' निग्रहाने झेपावतो, त्याचीही.

**१५. युद्धानंतर : युद्धग्रस्त स्थितीचा काव्यमय आढावा** - आदित्य दवणे

कोणत्याही संवेदनशील माणसाला युद्ध नको असतं. पण प्रत्यक्षात असं होत नाही. माणसांना असंवेदनशील करणारी युद्धं हा चिंतेचा विषय घेऊन आदित्य दवणे युद्धानंतर हा कवितासंग्रह घेऊन आले आहेत. आजच्या अस्वस्थ वर्तमानावर भाष्य करणारा हा कवितासंग्रह.

**१६. स्वतंत्रपणे एकल राहणाऱ्या स्त्रीचं आत्मकथन** - विनया खडपेकर

हे आहे स्वत:च्या निर्णयानं स्वतंत्रपणे एकल राहणाऱ्या स्त्रीचं आत्मकथन. साध्यासुध्या मध्यमवर्गीय कुटुंबातली ही मुलगी. जीवनात लग्न तिनं गृहीत धरलेलंच होतं. तरीही एका टप्प्यावर तिनं एकल आणि स्वतंत्रही राहण्याचा निर्णय घेतला - का? कसा? तिच्या जीवनाची निरनिराळी वळणं दाखवणारं हे आत्मकथन. मुलीचं लग्न होतं,

तेव्हा तिचं जीवन समूळ बदलतं; हे सर्वमान्य. पण ती एकटीनं स्वतंत्रपणे राहण्याचा निर्णय घेते तेव्हा? तिचं जीवन कसं बदलतं? काय होतं?

**१७. All about National Education Policy २०२०** - प्रा. डॉ. नितीन करमळकर आणि मंगला गोडबोले

नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० राज्यात अमलात येतंय. त्यासंबंधी मुलांच्या, पालकांच्या आणि शिक्षकांच्या मनातही अनेक प्रश्न आहेत, काहीशी धास्ती आहे. १९८६नंतर म्हणजेच तब्बल ३८ वर्षांनंतर देशाचं शैक्षणिक धोरण बदलत असल्यानं प्रश्न पडणं साहजिक आहे. त्यामुळेच या सगळ्या प्रश्नांची सविस्तर आणि सोप्या शब्दांत उत्तरं देणारं 'नवे शैक्षणिक धोरण : विद्यार्थी पालकांसाठी मार्गदर्शन' हे पुस्तक.

**१८. बाईची कथा आणि व्यथा मांडणारी कादंबरी**

'बाय गं' कादंबरी म्हणजे लहानशा खेड्यातला बायकांचा समूह आणि त्यांचा संघर्षमय प्रवास सजगपणे पाहणारी, विचार करणारी नायिका... ओघवत्या भाषेतली आणि चित्रमय शैलीतली ही कादंबरी.

**१९. समृद्ध, भावसंपन्न गोंदणखुणा**

एखाद्या संवेदनशील स्त्रीनं आपल्या जाणत्या सखीला कधी मनोगत तर कधी हृद्गत सांगावं, तसा या 'गोंदणखुणा'चा आशय. निसर्गातील एखाद्या घटकाचा अनपेक्षित साक्षात्कार, मानवी स्वभावातील अतर्क्य भावनाट्य, रुणझुणत्या कवितेच्या चरणाशी सहज घडलेला अर्थमेळ, स्त्री-संवेदनेशी जोडलेल्या घटना-प्रसंगांची चलतचित्र किंवा जीवनाच्या एखाद्या प्राणसूत्राचं स्वत:ला नि:संदर्भ करून केलेलं आत्मचिंतन म्हणजे 'गोंदणखुणा'.

**२०. ज्याचं त्याचं एव्हरेस्ट'**

हिमालय अनेकांना वेड लावतो. का? कसं? एव्हरेस्ट शिखर सर करण्याच्या अनावर ओढीपायी तीन पिढ्यांमध्ये निर्माण झालेले ताणतणाव, संघर्ष आणि परस्परांना समजून घेण्याचे प्रयास चित्रित करणारी - 'सत्य हे कल्पनेपेक्षा अद्‌भुत असतं' याचा प्रत्यय देणारी - सत्यघटनेवर आधारित कादंबरी!

**२१. चंद्रशेखर : जसं जगलो तसं** - अनु. अंबरीश मिश्र

समाजवादी विचारसरणीच्या मुशीत घडलेल्या, आणीबाणीत तुरुंगवास भोगलेल्या आणि १९८३ साली भारत यात्रेद्वारे देश पिंजून काढलेल्या चंद्रशेखर यांच्या 'जीवन जैसे जिया' या आत्मचरित्राचा 'जसं जगलो तसं' हा मराठी अनुवाद.

**२२. द सीक्रेट मिशन : एका अद्भुत रहस्याच्या मागावर...**

रहस्य-कथाकार बाबुराव अर्नाळकर आणि गुरूनाथ नाईक यांच्या सन्मानार्थ राजहंस प्रकाशनानं घेतलेल्या रहस्य सन्मान कादंबरी स्पर्धेतली द्वितीय क्रमांक विजेती कादंबरी म्हणजे 'द सीक्रेट मिशन'.

**२३. चंद्रकांत कुलकर्णी सादर करीत आहे!** - पूर्वार्ध

कवीनं असावं अल्पाक्षरी, आणि नाटककारानं मितभाषी. अभिनेत्यानं करावा संहितेतील अव्यक्त आशय व्यक्त. तंत्रज्ञानं साधावा शब्देवीण संवाद. पण मग,... दिग्दर्शकानं काय करावं? सांगत आहेत, मराठी नाट्यसृष्टीतील अग्रणी दिग्दर्शक आणि अभिनेते- चंद्रकांत कुलकर्णी.

**२४. विशेष संवाद : चंद्रकांत कुलकर्णी** - उत्तरार्ध

प्रसिद्ध दिग्दर्शक-अभिनेते चंद्रकांत कुलकर्णी यांच्यासोबतच्या विशेष संवादाचा हा उत्तरार्ध..

**२५. आनंदाच्या दाही दिशा**

ही आहे मुक्त मुशाफिरी... नानाविध प्रदेशांची, भौगोलिक, तसेच मानसिकही. हेतू, साधने आणि साध्य काहीही असो, आहे कमालीची आनंददायी आणि चिंतनगर्भ.

**२६. दंवभिजली वही**

'फुलांनी बहरलेली नाजूक डहाळी वाऱ्याच्या झुळकीने चांदण्यात थरथरावी' तसेच काहीसे श्री. हिमांशु कुलकर्णी यांची कविता वाचताना होते. हा कविवर्य मंगेश पाडगावकरांचा अनुभव वाचकालाही देणारा हा कवितासंग्रह.

**२७. वस्त्र-परंपरेचा अनमोल ठेवा**

जनजीवनाशी अतूटपणे एकरूप झालेल्या वस्त्रधाग्यांच्या मोहक प्रतिमा साहित्याच्या कथाकाव्यातून, चित्र-शिल्पांच्या रंगरेषांमधूनही उमटल्या. एका हुन्नरी कलाकाराने, व्यासंगी अभ्यासकाने आणि जाणकार तज्ज्ञाने विविधांगांनी घेतलेला या वस्त्रसंस्कृतीचा वेध.

**२८. आपण एका टकमक टोकाकडे चाललोय?**

निसर्गाची हत्या म्हणजे माणसाची आत्महत्या. कशी, ते सांगणारं 'निसर्गकल्लोळ' हे अतुल देऊळगावकर यांचं पुस्तक.

**२९. पृथ्वी धुंडाळणाऱ्या शोधनायकांची गाथा!**

गेल्या दोन हजार वर्षांतील पृथ्वी धुंडाळणाऱ्या असंख्य शोधनायकांची गाथा डॉ. अनुराग श्रीकांत लव्हेकर यांचं 'वसुंधरेचे शोधयात्री' हे पुस्तक उलगडतं.

**३०. पं. जितेंद्र अभिषेकी यांचा जीवनप्रवास**

पं. जितेंद्र अभिषेकी. शिष्य, मैफलगायक, संगीतकार आणि गुरू ही त्यांची संगीतविश्वातील चार रूपं. स्वत:च स्वत:च्या तत्त्वांशी, ध्येयांशी, उद्दिष्टांशी स्पर्धा करत पराकोटीच्या तन्मयतेनं एकाच वेळी साकारलेल्या या चार भूमिका! त्यात आपण अव्वलच असलं पाहिजे, ही त्यांची आंतरिक ऊर्मी! अशा या प्रतिभावान, चतुरस्र कलाकाराच्या व्यक्तिमत्त्वाचा अन् संगीतकर्तृत्वाचा वेध घेणारा चरित्रग्रंथ.

### ३१. पुनश्च हनिमून

ही गोष्ट आहे सुहास आणि सुकन्याची. त्यांच्या पहिल्या लग्नाच्या दुसऱ्या हनिमूनची. पण लग्नानंतर सात वर्षांनी माथेरानला त्याच हॉटेलमध्ये पोचल्यावर बरंच काही विस्कटलंय ही जाणीव त्यांना अस्वस्थ करतीय. पण नकळत उसवत चाललेल्या नात्याची ही गोष्ट फक्त त्या दोघांची राहत नाही. पस्तिशी-चाळिशीतल्या अनेक जोडप्यांच्या जगण्याशी-सहजीवनाशी जाऊन ती भिडते. या कथेचा रंगमंचीय आविष्कार म्हणजे संदेश कुलकर्णी लिखित-दिग्दर्शित पुनश्च हनिमून हे नाटक. या विलक्षण वेगळ्या धाटणीचं नाटक नुकतंच पुस्तकरूपात राजहंस प्रकाशनानं प्रकाशित केलंय. यानिमित्तानं संदेश कुलकर्णी आणि अमृता सुभाष यांच्यासोबत रंगलेला संवाद राजहंसी मोहोर पॉडकास्टद्वारे घेऊन आलोय.




एकापाठोपाठ एक महत्त्वपूर्ण धरणांची उभारणी करणाऱ्या एका कुशल इंजिनियरच्या नजरेतून धरणप्रकल्पाशी नाळ जोडलेल्या एका आगळ्यावेगळ्या जगाचा अन् संस्कृतीचा वेध घेणारी अनोखी कादंबरी.

धरणसूक्त

विलास शेळके

किंमत : ₹ ३८०/- । (ट.ख. ₹ ५०)

सामान्य माणसाची प्रयोगशाळा आहे ‘कट्टा’. प्रत्येकाला सर्वकाळ आणि सर्वत्र उपलब्ध असलेली. अशा ‘कट्टा’ प्रयोगशाळेतून विज्ञानक्षेत्र अधिक निकोप आणि लोकाभिमुख करणारे -

कट्टा मॉडेल

डॉ. मिलिंद वाटवे

किंमत : ₹ ३००/- । (ट.ख. ₹ ५०)



## ‘राजहंसी’ विविधा




शिष्य, मैफलगायक, संगीतकार आणि गुरू
ही त्यांची संगीतविश्वातील चार रूपं.
यात अव्वल असण्याची त्यांची आंतरिक ऊर्मी!
यातून खूप काही घडत गेलं. या प्रवासाचा वेध

### अभिषेकी

पं. जितेंद्र अभिषेकी : कला आणि जीवनप्रवास

शैला मुकुंद

किंमत : ₹ ५००/- । (ट.ख. ₹ ५०)

आजच्या सामाजिक-राजकीय-आर्थिक परिस्थितीशी
नानाविध ज्ञानशाखांच्या एकात्मिक अभ्यासाचा
संबंध जोडत माणसाच्या व्यक्तिगत
अन् सामूहिक वर्तनाचा वैज्ञानिक वेध घेणारे...

### माणूस ‘असा’ का वागतो?

अंजली चिपलकट्टी

किंमत : ₹ ५५०/- । (ट.ख. ₹ ५०)






ही कथा आहे सत्तरीच्या दशकातील तरुणीची.
ओढाळ तरुण वयात मोहाच्या एका धूसर क्षणी
अपघातानं ती एक चूक करते.
पण त्यापायी तिचं सारं आयुष्यच बदलून जातं.
यातून सुटण्याचा मार्ग तिला सापडतो का?
परतीची वाट सापडते का?

### डोईचा पदर आला खांद्यावरी...

डॉ. छाया महाजन

किंमत : ₹ २८०/- । (ट.ख. ₹ ५०)



# आठवणींच्या खिडकीतून

## सार्थक झाले लेखाचे

'नाट्यसंपदा कलामंच', चंद्रमंगल आर्ट्स आणि शौर्य प्रॉडक्शन यांच्या संयुक्त निर्मितीनं सादर केलेलं, 'गोष्ट संयुक्त मानापमानाची' या नाटकाचा प्रयोग पाहण्याचा योग रविवार दि. १२ ऑक्टोबर २०२४ रोजी पुण्यातील 'यशवंतराव चव्हाण' नाट्यगृहात आला. लेखक अभिराम भडकमकर, दिग्दर्शक हृषीकेश जोशी, निर्माते अनंत वसंत पणशीकर, श्यामराज पाटील यांच्या संयुक्त प्रयत्नातून हा खेळ मांडला गेला आहे. आवर्जून सांगण्यासारखी गोष्ट म्हणजे 'तरुणाई'सुद्धा प्रयोगाला भरपूर प्रमाणात होती. प्रयोग दुपारचा होता. बुकिंग हाउसवर चाहत्यांची गर्दी पाहून मन सुखावलं. निर्माते अनंत पणशीकर यांनी माझे दोन्ही हात घट्ट पकडून उद्गार काढले - 'रामभाऊ, हे नाटक मी वाचलं. पण यापूर्वी तुमच्या पुस्तकातील 'संयुक्त मानापमान' लेख मी वाचला होता. तो वाचूनच या नाटकाची निर्मिती करावी असं मला तीव्रतेनं जाणवलं!'

हे सारं संभाषण माझ्यासमवेत आलेल्या माझी पत्नी सौ. संजीवनी आणि अमेरिकास्थित धाकटी कन्या डॉ. आरती रानडे यांनी ऐकलं. माझी कन्या सहजपणे, उत्स्फूर्तपणे मला म्हणाली, ''बाबा, तुमचा लेख सार्थकी लागला.''

तिसरी घंटा झाली. नाटकाचा पडदा उघडला. नांदीचे सूर प्रेक्षागृहात घुमू लागले. नटी-सूत्रधाराचा प्रवेश सुरू झाला आणि एका मध्यांतरानंतर पुढील दुसरा अंक सुरू झाला. जवळ जवळ साडेतीन-चार तास रंगलेला 'गोष्ट संयुक्त मानापमानाची' खेळ टाळ्यांच्या प्रचंड गजरात संपन्न झाला. जवळजवळ शंभर-सव्वाशे वर्षांपूर्वीची मराठी रंगभूमी प्रत्यक्ष रंगमंचावर अवतरली होती आणि एकविसाव्या शतकातील विविध वयोगटातील रसिक प्रेक्षक तो सोहळा अनुभवत होते.

'नाट्यं भिन्नरुचेर्जनस्य बहुधाप्येकं समाराधन्' हे प्रत्यक्ष साकारले होते. त्या दिवशीचा प्रयोग उत्तमच झाला. जसेजसे अधिकाधिक प्रयोग होतील, त्यात विविध असे पैलू पाडले जातील; तसतसे नाटक अधिक रंगेल अशी आश्वासक निर्मिती तो प्रयोग पाहून मिळाली हे निश्चित!

रंगमंचावरचे नाटक बघत होतो, पण एक मन मात्र सतत मला दुसऱ्याच आठवणींकडे ओढून नेत होते. तोही विषय होता संयुक्त मानापमानाचाच! काय

विलक्षण योगायोग! माझं मन भिरभिरत होते मी लिहिलेल्या एका लेखाकडे आणि रंगमंचावर उलगडला जात होता त्याच लेखाचा नाट्यरूपातील आविष्कार. सर्व तंत्रमंत्रासहित. प्रयोग संपला. सर्व नाट्यसंबंधितांना भेटून त्यांचे मनापासून अभिनंदन करून आम्ही घरी परत आलो आणि पुन्हा एकवार माझ्या कन्येने तेच बोल काढले, 'बाबा, तुमच्या लेखाचं सार्थक झालं.' सौभाग्यवतीनेही त्याला दुजोरा दिला. कारण, ती प्रत्यक्ष या लेखनकार्यात सहभागी होती.

नाट्यपंढरी सांगली आणि बालगंधर्वांनी जिथे रंगभूमीवर पहिलं पाऊल ठेवलं ते मिरज ही माझी कॉलेजजीवनापर्यंतची कार्यस्थळं. या कृष्णेच्या पाण्यावरच माझं बालपण जोपासलं. नाटक-सिनेमाचा, वाचनाचा छंद जडला तो इथेच. विष्णुदास भावे, कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर, गोविंद बल्लाळ देवल, राम गणेश गडकरी, आचार्य अत्रे, वासुदेवशास्त्री खरे, पु. ल. देशपांडे यांची ओळख झाली त्यांनी लिहिलेल्या नाटकातून, साहित्यामधूनच. पुण्यात आल्यावर त्याला अधिक खतपाणी मिळाले. नाटक-सिनेमांमधून काम करता करता काहीबाही लिहू लागलो. लिहिण्याची अधिक संधी दिली ती माझे मित्र आणि लोकसत्ताचे पुणे आवृत्तीचे संपादक मुकुंद संगोराम यांनी. जानेवारी २०१० ते डिसेंबर २०१२ या वर्षभरात प्रत्येक पंधरा दिवसांनी एक अशा रितीने नाट्यविषयाला वाहिलेले लेख लिहिले. मला जुन्या-नव्याचा सेतू बांधायचा होता, म्हणून विषय निवडताना मी अशी योजना केली; ती माझा लेख ज्या महिन्यात, ज्या दिनांकाला प्रसिद्ध होणार त्या दिवसाच्या आगेमागे नाट्यक्षेत्रात काय विशेष घटना घडली. उदा. २३ जानेवारी - राम गणेश गडकरी पुण्यतिथी, २७ फेब्रुवारी - नाटककार वि. वा. शिरवाडकर उर्फ कुसुमाग्रज यांचा जन्मदिन! म्हणजेच मराठी भाषा दिन! १६ डिसेंबर १९७२ - घाशीराम कोतवाल नाटकाचा पहिला प्रयोग याची निवड करायची. जुलै महिना सुरू झाला आणि ८ जुलै १९२१ रोजी मुंबईला झालेल्या आणि नाट्यक्षेत्रात माईलस्टोन म्हणून गणल्या गेलेल्या 'संयुक्त मानापमान' या नाटकाचा विषय मला लेखासाठी अतिशय योग्य वाटला. नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर उर्फ काकासाहेब खाडिलकर यांचे हे पहिले संगीत-नाटक. प्रथम ते किर्लोस्कर नाटक मंडळीने सादर केले. त्यानंतर बालगंधर्वच्या गंधर्व नाटक मंडळीने (स्थापना - १९१३) आणि केशवराव भोसले यांच्या ललितकलादर्पण (स्थापना १९०८) यांनी स्वतंत्रपणे प्रयोग करून भरपूर नावलौकिक मिळविला. संगीतसूर्य केशवराव भोसले आणि संगीतचंद्र बालगंधर्व यांनी एकत्रित येऊन 'संयुक्त मानापमान'चे प्रयोग करावेत अशी मनोमन इच्छा देशभक्त आणि 'संदेश' वृत्तपत्राचे संपादक, अच्युत बळवंत कोल्हटकर यांच्या कल्पक डोक्यात होती. १९१८मध्ये त्यांनी तसे करण्याचा प्रयत्नही केला होता. त्या वेळी तो सफल झाला नाही, पण तशी संधी पुन्हा १९२१मध्ये पुन्हा चालून आली.

लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांचे १ ऑगस्ट १९२० रोजी महानिर्वाण झाले.

लोकमान्य मराठी नाट्यकलेचे आधारस्तंभ होते. त्यांच्याविषयी मराठी नाट्यसृष्टीत अतीव आदर होता. टिळकांच्या जागी महात्मा गांधी यांच्या हाती स्वराज्य चळवळीची सूत्रे आली आणि त्यातून एक वर्षाचे आत स्वराज्य मिळविण्याचा संकल्प सोडला गेला. त्याआधी सहा महिन्यांच्या आत १ कोटी रुपयांचा निधी गोळा करण्याची घोषणा गांधींनी केली आणि त्याला नावही दिलं 'टिळक स्वराज्य फंड'! आणि तो निधी जमविण्यासाठी 'संयुक्त मानापमान' या कल्पनेला प्रत्यक्ष उतरविण्याचा बूट निघाला.

लेखाचा विषय निवडल्यावर मला केवळ लहानपणी ऐकलेल्या आणि रसभरित वर्णन केलेल्या 'संयुक्त मानापमान'च्या ऐकीव गप्पांवर विसंबून राहणे चालणार नव्हते. ते सारे वर्णन म्हणजे 'एक हात लाकूड तर सव्वा हात ढलपी' अशा प्रकारचे होते. माझ्या वडिलांचे (शंकर वामन रानडे) यांचे सांगलीपासूनचे बालमित्र बन्याबापू कमतनूरकर प्रत्यक्ष उपस्थित होते. ते ललितकलादर्शनने सादर केलेल्या 'श्री' या नाटकाचे लेखक न. ग. उर्फ बन्याबापू कमतनूरकर. केशवराव भोसले आणि ते या प्रयोगासाठी पुण्याहून मुंबईला जाण्यास निघाले. त्या वेळी केशवराव त्यांना म्हणाल्याचे सांगत - 'बन्याबापू, ज्या प्रसंगाची मी जन्मभर वाट बघत होतो, तोच हा प्रसंग!' हे सर्व मी ऐकलेले होते, पण लेख लिहिण्याच्या निमित्ताने नाटककार वसंत शांताराम देसाई, ललितकलाचे प्रख्यात नेपथ्यकार पु. श्री. काळे, संदेशकार अच्युत बळवंत कोल्हटकर आणि अनेक लेखकांचे संयुक्त मानापमानाचे संबंधीचे लेखांचे वाचन झाले. आणि मगच लेखणी हाती धरली.

वर्षभराची लेखांची मालिका अखेर पूर्ण झाली. यानिमित्ताने भरपूर वाचन घडले. त्या काळात डोळ्यांचे मोतीबिंदूचे ऑपरेशन झाले, एक डोळा कायमचा गेला. पण सौभाग्यवतीच्या मदतीने लेखमाला पूर्ण केली. ती माझी लेखनिक झाली. यथावकाश या लेखांचे 'कालमुद्रा-मराठी नाट्यसृष्टीतील' हे मराठी रंगभूमीचा जवळजवळ १७५

अपयशाचा धोका पत्करणं हा प्रायोगिकतेतला महत्त्वाचा भाग.
हा धोका पत्करून आपली निसर्गदत्त शक्ती अन् कौशल्य
जिवंत आणि सुस्थितीत राखणारी मुंबईची प्रायोगिक रंगभूमी.
तिच्या तीन दशकांच्या इतिहासाचा दस्तऐवज

प्रायोगिक रंगभूमी : तीन अंक

मुंबईतील प्रायोगिक रंगभूमीचा मौखिक इतिहास



मूळ इंग्रजी ग्रंथाचे संपादन : शांता गोखले
अनुवाद आणि संपादन : माधव वझे
किंमत : ₹ २७५/- । (ट.ख. ₹ ५०)

वर्षांचा धावता इतिहास मांडणारे पुस्तकही प्रकाशित झाले. त्याला वाचकांचा उत्तम प्रतिसाद लाभला.

ते पुस्तक वाचूनच आणि त्यातील ‘संयुक्त मानापमान’ प्रकरण वाचूनच अनंतराव पणशीकर हे नाटक करण्यास तयार झाले. केवळ माझा लेख वाचून ते तयार झाले असे मी म्हणणे मूर्खपणाचे आहे. त्याला अनेक कारणे असतील पण हा नाट्यसेतू उभारण्यास या रामाचा खारीचा तरी वाटा आहे हे त्यांनीच मला आवर्जून सांगितले. माझ्या लेखाचे सार्थक झाले असे मला वाटते. अनंतराव! लाखमोलाची देणगी आपण मला दिली आहे. आजकाल एका नाटकाची निर्मिती करणे म्हणजे काही लाखांची बिनभरवशाची गुंतवणूक असते याची मला पूर्ण जाणीव आहे. माझ्या या लेखाचा आदरपूर्वक उल्लेख करून तुम्ही नव्या पिढीवर आपल्या मराठी रंगभूमीविषयीचे कुतूहल निर्माण करीत आहात. जुन्यानव्याचा उत्तम संगम साधत आहात. प्रत्यक्ष नाट्यनिर्मितीतून सेतू बांधत आहात आणि माझ्यासारख्या किंचित लेखकाला पुन्हा नव्याने पांढऱ्यावर काळे लिहिण्याची संधी देत आहात. रंगभूमीविषयीचे लेखन करण्याचा प्रयत्न करतो आणि नव्याने लिहितो.

श्रीशं वन्दे । केशवाय नमः ।

नारायणाय नमः । नटेश्वराय नमो नमः ।

***श्रीराम रानडे***

९८२३१४४७०९



ही कहाणी केवळ आकाशात भरारी घेणारा वैमानिक कायमसाठी चाकाच्या खुर्चीत जखडबंद होतो त्याची नाही, तर पुनश्च ‘राखेतून उगवतीकडे’ निग्रहाने झेपावतो, त्याची आहे.

राखेतून उगवतीकडे

विंग कमांडर अशोक लिमये

अनुवाद : सोनाली नवांगुळ

किंमत : ₹ ३२५/- । (ट.ख. ₹ ५०)

## क...
## कवितेचा

मराठी मनाच्या सर्जनशीलतेला
पाऊलवाट देणारे सदर

### माझं काय चुकलं

खरंच माझं काय चुकलं का?
खरं तर माझं नाही काही चुकलं
पण तरीही काहीतरी चुकलंय

उगाच मध्येमध्ये मत मांडणे
अनुभवातून शहाणपण शिकवणे
नाही आवडत ते सगळ्यांना

गप्प राहून मंद हास्य करणे
डॉक्टर सांगतात गप्प राहू नका
खूप हसा खूप सगळ्यांशी बोला

पण सगळे आहेत कुठे
आपापल्या जीवनात सर्व व्यस्त
उगाच ढवळाढवळ करणे नाही रास्त

तेव्हा आता ठरवलं
एकटे असताना खूप बोलायचे
मनसोक्त मोकळे हसायचे

छान छान गाणी म्हणायची
फोनवरून संवाद साधायचे
आनंदात दिवस घालवायचे

न बोलणे ही एक साधना आहे
मनातच विचार करणे एक कला आहे
चुका करण्याचा प्रश्नच येत नाही

***निरुपमा***

**विज्ञानाबद्दल कुतूहल असणाऱ्या, तसेच रहस्य आणि गूढतेविषयी आकर्षण असणाऱ्या रसिक वाचकांसाठी तीन कादंबऱ्या...**



नव्याने रुजू झालेला तरुण, तडफदार इन्स्पेक्टर धनेश...
गावातील प्राचीन शिवमंदिर नि त्याविषयीच्या आख्यायिका...
एकामागोमाग एक घडणाऱ्या रहस्यमय घटना...
धनेश त्याच्या गुप्त 'मिशन'मध्ये यशस्वी होणार का?

## द सीक्रेट मिशन

राधिका कुलकर्णी

किंमत : ₹ २६०/- । (ट.ख. ₹ ५०)

१६९५मध्ये औरंगजेबाच्या एका जहाजावर पडलेल्या दरोड्याचा शोध घेण्यासाठी कृत्रिम बुद्धिमत्तेचा उपयोग केला जातो. ही सांगड घालताना निर्माण होणारे प्रश्न आणि निघणारे निष्कर्ष खरे असतील का? किंवा खरेच निघाले तर...?

## १६९५ : स्मार्ट रोबो, एआय आणि औरंगजेब...!



सुरेश वांदिले

किंमत : ₹ २४०/- । (ट.ख. ₹ ५०)



पंचक्रोशीतला वतनदारांचा वाडा. वैभवशाली, सालंकृत लक्ष्मीसारखा देखणा... वाड्यात अधूनमधून दिसणारा मूळपुरुष नाग... आणि घरातल्या कर्त्या, सवाष्ण स्त्रियांना अल्पायुष्याचा शाप... काळाच्या कुपीत दडलेली रहस्यं उलगडत जाणारी कादंबरी.

## सवाष्ण

डॉ. क्षमा गोवर्धने शेलार

किंमत : ₹ ३८०/- । (ट.ख. ₹ ५०)

## उद्‌गार

नियतकालिकांचे/
समाजमाध्यमांचे अभिप्राय

## गोंदणखुणा

*लेखिकेच्या जाणिवांचा पैस व्यष्टी ते समष्टी असा विस्तारत जीवनानुभवांना सन्मुख झाला आहे. ठायीचे संवेदन अनुभवांशी तादात्म्य होताना तिचे आत्मविलोपन शब्दांपल्याडचे भावविश्व साकारत निराकाराला साद घालते.*

जगण्याच्या असोशीने, भरभरून घेतलेला आनंद आणि जगण्याकडे बघण्याचा चिंतनशील दृष्टिकोन यांतून शब्दरूप घेऊन उमटलेल्या 'गोंदणखुणा' वाचकाला सर्वार्थाने समृद्ध करतात. डॉ. प्रिया निघोजकर यांचा हा ललितलेखसंग्रह 'राजहंस'ने अलीकडेच प्रकाशित केला आहे. मराठीतील ललितलेखनाच्या परंपरेचा प्रवाह डॉ. निघोजकर सामर्थ्याने पुढे घेऊन जाऊ शकतील अशा प्रातिभ, शैलीदार खुणा या संग्रहाच्या पानोपानी आहेत. एका वृत्तपत्रातील साप्ताहिक सदरासाठी केलेले हे लेखन. वास्तविक वृत्तपत्रीय मर्यादित अवकाशाचे आव्हान सोपे नसते; परंतु डॉ. निघोजकर यांनी मर्यादित शब्दावकाशात स्मरण आणि चिंतनातून सर्जनाची लोभस, अम्लान इंद्रधनुष्ये साकारली आहेत. संग्रहात एकूण १०२ लेख आहेत.

'प्रेमपूर्ण मधु बाल्य अहा ते' या पहिल्या भागात आपल्या बालपणच्या संस्कारक्षम अनुभवांचे वेचक आणि वेधक रंग त्या उलगडतात. 'मोल चार आण्याचे' या पहिल्याच लेखात अल्लड, स्वप्नाळू मनाला जत्रेचे-उत्सवाचे असलेले आकर्षण आणि त्यासाठी स्वकमाईतून पैसे जमा करण्याची धडपड यातील भानावर आणणारा क्षण मन हेलावणारा आहे. 'राबायला आम्ही आहोत. तुम्ही मन लावून शिका, मोठ्या व्हा', या आईच्या साध्या बोलण्यातून मिळालेला प्रेरक संस्कार आणि श्रमजाणिवेच्या प्रकाशात दिसू लागलेला जगण्याचाच उत्सव हा लेखाचा परमोत्कर्ष म्हणजे लेखिकेने पुढे येथवर केलेल्या वाटचालीतील जणू दिशादर्शक भान! लेखिकेचे बालपणातील अनुभव गुंजभर असले तरी त्यात मन विभोर करणारे निसर्गाचे व्यापक रूप साठवलेले असते, व्यावहारिक ज्ञान असते आणि नात्यांमधील गोडवाही! भावसखी बाभूळ, मेंदी, जगण्याचा खळाळ, त्या फुलांच्या गंधकोशी, दीपमाळ,

दिवेलागण, रांगोळी अशा अनेक लेखांतून याचे प्रत्यंतर येते. भाषा, काव्य, संगीत, निसर्ग, बालपण, नाती, शिक्षण, सण-उत्सव, भवतालातील वास्तव असे सारे कवेत घेताना लेखिकेने तिला प्रभावित करणाऱ्या विविध क्षेत्रांतील महनीयांचे विचार आणि स्मरण यांचेही मोल या पुस्तकात जाणवून दिले आहे.

'सौंदर्याच्या नव नव लीला' या दुसऱ्या भागातील लेखांचे वेधक वैशिष्ट्य म्हणजे लेखिकेच्या जाणिवांचा पैस येथे विस्तारला आहे. व्यष्टी ते समष्टी या प्रवासात जीवनानुभवांना निसर्गतत्त्वाची सौंदर्यलक्ष्यी सोबत मिळते. विनोबांसारख्या चिंतक व्यक्तिमत्त्वाच्या जीवनचिंतनाने नवी दृष्टी प्राप्त होते. या भागातील अनेक लेख वाचताना जाणवते ती लेखिकेची आत्ममग्नता, तिच्या मनात सदैव रुणझुणत असलेला कवितेचा नाद आणि कवितेची लय, जगण्याच्या वेल्हाळ वास्तवातले निसर्गरंग टिपण्याची तिची वृत्ती. या साऱ्यांतून तिच्या ठायीचे संवेदन कधी बोलके होते, तर कधी अनुभवांशी तादात्म्य होताना तिचे आत्मविलोपन शब्दांपल्याडचे भावविश्व साकारत निराकाराला साद घालते.

या संग्रहातील तिसरा भाग म्हणजे 'मानवतेचे महन्मंगल गाणे'. इथे दुर्गाबाई आहेत, इंदिराबाई आहेत, शांताबाई आहेत, गोविंदाग्रज आहेत. तसेच लेखिकेच्या हृदयात स्थान मिळवणारे मार्गदर्शक डॉ. सु. रा. चुनेकर, प्रा. रा. ग. जाधव, प्रा. रा. श्री. जोग हेही आहेत. काव्याचा, ललितलेखनाचा वारसा आणि संशोधनवृत्तीचा वसा यांचा तरल तोल लेखिकेने उत्कट भावस्पर्शी लेखनातून साधला आहे. डॉ. प्रिया निघोजकर यांचे ललितलेखनाचे हे पहिलेच पुस्तक आहे. थोर कादंबरीकार आणि समीक्षक प्रा. त्र्यं. वि. सरदेशमुख यांच्या समग्र लेखनाचा चिकित्सक अभ्यास पीएचडी प्रबंधलेखनासाठी त्यांनी केला आणि तो प्रसिद्धही झाला. वाखाणला गेला.




निसर्गातील अनपेक्षित साक्षात्कार,
मानवी स्वभावातील भावनाट्य,
कवितेचा रुणझुणता चरण
यावरील आत्मचिंतनातून आलेले लेख

गोंदणखुणा

डॉ. प्रिया निघोजकर

किंमत : ₹ ३००/- । (ट.ख. ₹ ५०)

अशा संशोधकवृत्तीच्या लेखिकेचे मन काव्य आणि निसर्गप्रमाने ओथंबून इथे संवादी झाले आहे.

या संग्रहातील चौथा विभाग आहे ‘स्वानंदाच्या ‘त्या’ रानात’. आत्ममग्नतेतून मनाचा आणि मौनाचाही शोध घेत लेखिका इथे चिंतनवृत्तीच्या अभिव्यक्तीने मोहरलेली आहे. अनुभवांच्या बीजकणांतून मोहरून येत आपल्याच तरल अभिव्यक्तीकडे उत्कट तटस्थतेने पाहण्याची किमया डॉ. प्रिया निघोजकर यांना साधली आहे. त्यामुळेच अंतर्मन आणि बाह्य वास्तव यांतील द्वंद्वाने विचलित न होता संयम, सद्भाव आणि सकारात्मकतेचा विचार इथल्या प्रत्येक लेखातून प्रकट होतो. निर्मोही भावनांचा तळ जीवनोल्हासाची उंची गाठतो. लेखिकेच्या या वैयक्तिक उन्नयनाने वाचक नक्कीच प्रभावित होईल. तिच्या लेखनातील साध्या साध्या घटना आणि घटितांमधून जगण्याकडे बघण्याची नवी दृष्टी त्याला नक्कीच मिळू शकेल. ललितलेखनाचे असे फलित ही लेखिकेच्या दृष्टीने कल्याणकारी शुभंकर नांदीच ठरावी. नांदी यासाठी की ललितलेखनाचे त्यांचे हे पहिलेच पुस्तक.

‘राजहंस’च्या या पुस्तकाची मांडणी, बांधणी, अंतर्गत सजावट अत्युत्तम आहे. कवी हेमकिरण पत्की यांची समर्पक शब्दांतली ‘पाठराखण’ लेखिकेच्या सामर्थ्यांची ओळख करून देते. रविमुकुल यांनी चितारलेले मुखपृष्ठ वेधक आणि अप्रतिम आहे.

***सुनील शिनखेडे***

(*महाराष्ट्र टाइम्स ‘संवाद’ पुरवणी,* १५ नोव्हेंबर २०२४मधून साभार)


बेर्डेंमधला लेखक - दिग्दर्शक - चित्रकार - नेपथ्यकार - पार्श्वसंगीतकार - जाहिरात कलाकार - वाद्यवृंदकार कसा घडत गेला, नावारूपाला आला याची ही प्रेरणादायक कहाणी. कोकणच्या अंत:स्पंदनांची रम्य स्मरणयात्रा.

हिरवी पोर्ट्रेट्स

पुरुषोत्तम बेर्डे

किंमत : ₹ २८०/- । (ट.ख. ₹ ५०)



## ‘राजहंसी’ विविधा



मुलीचं लग्न होतं, तेव्हा तिचं जीवन समूळ बदलतं;
हे सर्वमान्य! पण ती एकटीनं, स्वतंत्र राहण्याचा
निर्णय घेते, तेव्हा? तिचं जीवन कसं बदलतं?
काय होतं? स्वत:च्या निर्णयानं, स्वतंत्रपणे,
एकल राहणाऱ्या स्त्रीचं आत्मकथन.

### विवाह नाकारताना

विनया खडपेकर

किंमत : ₹ ४३०/- । (ट.ख. ₹ ५०)

ही आहे मुक्त मुशाफिरी... नानाविध प्रदेशांची,
भौगोलिक तसेच मानसिकही. हेतू, साधने
आणि साध्य काहीही असो,
आहे कमालीची आनंददायी आणि चिंतनगर्भ.

### आनंदाच्या दाही दिशा

एक मुक्त प्रवास

डॉ. आरती रानडे

किंमत : ₹ ३००/- । (ट.ख. ₹ ५०)






चीन जितका आधुनिक, तितकाच ऐतिहासिकही.
आजही भारताबरोबरचा संघर्ष असेल वा अमेरिकेशी स्पर्धा-
चिनी सत्ताधीश आपली धोरणं ठरवताना इतिहासात
दडलेल्या सूत्रांचा आधार घेत असतात. हे चकित
करणारं विलक्षण चिनी प्रारूप समजावून देणारं-

### मेड इन चायना

गिरीश कुबेर

आवृत्ती दुसरी । किंमत : ₹ ४५०/-
(ट.ख. ₹ ५०) । (हार्डबाऊंड)

# राजहंसी पार

काय घडलं
'राजहंसी' नगरीत?

## 'अभिषेकी' पुस्तक प्रकाशन



डावीकडून : शैला मुकुंद, पं, शौनक अभिषेकी, शंकर अभ्यंकर, दिलीप माजगावकर

२१ सप्टेंबर हा पं. जितेंद्र अभिषेकी यांचा जन्मदिन. या दिवसाचं औचित्य साधून २० सप्टेंबर रोजी 'नक्षत्रांचे देणे' कार्यक्रमात 'अभिषेकी : पं. जितेंद्र अभिषेकी कला आणि जीवनप्रवास' या सांगीतिक चारित्रग्रंथाचं प्रकाशन, गुरुदेव शंकर अभ्यंकर यांच्या हस्ते झालं. या प्रसंगी व्यासपीठावर 'राजहंस प्रकाशना'चे सर्वेसर्वा दिलीप माजगावकर, अभिषेकीबुवांचे सुपुत्र आणि शिष्य शौनक अभिषेकी आणि लेखिका शैला मुकुंद उपस्थित होते.

अभ्यंकर म्हणाले, ''खरं तर अभिषेकीबुवांची कला म्हणजेच त्यांचा जीवनप्रवास होता. त्यांचा जीवनप्रवास म्हणजेच त्यांची कला आहे. या दोन गोष्टी वेगळ्या नाहीतच. त्यांचा जन्म संगीतासाठीच होता आणि ते संगीतासाठीच जगले. मी त्यांच्या अनेक मैफिली ऐकलेल्या आहेत. एक मैफल मला आठवतेय. राग मारवा गायले होते. असा रंगतदार गायले, की श्रोत्यांची प्रचंड दाद मिळत होती. तबल्याच्या साथीला नाना मुळे होते. नानासुद्धा तयारीचे तबलावादक. पण त्या दिवशी त्यांना वाजवणं अवघड झालं.

ते मैफिलीतून उठले आणि त्यांनी बुवांचे पाय धरले. म्हणाले, ‘बुवा, मला वाजवता येईल, असं काही गा.’

‘‘बुवांसारख्या कलावंतांना खूप टाकीचे घाव सोसावे लागतात. बुवांनाही खूप सोसावं लागलं. संघर्ष करावा लागला. शैलाताईंनी अनेक आठवणी सुंदर शब्दांत लिहिल्या आहेत. ‘असा येता देखे रथ...’ या श्लोकातील ‘जगन्नाथे केले मज सकल लोकांत बरवे’ या शेवटच्या ओळीचा लेखिकेनं चपखल उपयोग केला आहे. गुरू जगन्नाथबुवांनी अभिषेकांना भरभरून दिलं. अभिषेकींनीही आपल्या शिष्यांना मुक्त हस्ते विद्यादान केलं.’’

या ग्रंथप्रकाशनामागची ‘राजहंस’ची भूमिका माजगावकर सरांच्या सांगण्यावरून शैला मुकुंद यांनी मांडली. ‘‘सर आणि अभिषेकीबुवांचा ऋणानुबंध अनेक वर्षांचा होता. एक आठवण सांगते. एकदा बुवा आणि सर पुण्याहून मुंबईला रेल्वेच्या एकाच डब्यातून प्रवास करत होते. गप्पांच्या ओघात बुवांनी तानसेन या थोर गायकाची कथा सरांना ऐकवली. त्यांना तानसेनवर कादंबरी लिहायची होती. मात्र बुवांच्या हातून लिखाण पूर्ण होऊ शकलं नाही. पुढे काही वर्षांनंतर माजगावकर सरांनी ‘लोकसत्ता’मध्ये लेख लिहिला होता- ‘आणि कादंबरी डेक्कन क्वीनमध्ये राहिली’. सांगायचा मुद्दा असा की, अलीकडेच सरांचा ‘वाणी आणि लेखणी’ हा ग्रंथ प्रकाशित झाला आहे. त्यांनी आठवणीनं या लेखाचा समावेश त्यात केला आहे. असं या दोघांचं मैत्र होतं, ऋणानुबंध होता. ‘राजहंस’तर्फे हा ग्रंथ प्रकाशित होतोय त्यामागे हेही एक महत्त्वाचं कारण आहे.’’

आपल्या लेखन-प्रवासाविषयी त्या म्हणाल्या, ‘‘ज्या व्यक्तींना अभिषेकीबुवांचा सहवास मिळाला आहे, त्यांच्या मी मुलाखती घेतल्या. त्यातून बुवांचं बहुरूपी, बहुस्पर्शी व्यक्तिमत्त्व समोर येत गेलं. शिष्य, मैफीलगायक, संगीतकार, बंदिशकार आणि गुरू अशी त्यांची संगीतविश्वातील ठळक ओळख आहे. ती या पुस्तकात आहेच. याखेरीज त्यांचा अनेक विषयांचा व्यासंग, मराठी-कोकणी-इंग्रजी-संस्कृत भाषांचा व्यासंग, त्यांचे छंद... अशी अधिकची माहिती मिळत गेली. तीही या ग्रंथात मांडण्याचा प्रयत्न केला आहे. या लेखनप्रवासात ‘मला उमजलेले अभिषेकीबुवा’ हे त्यांचं एकमेव व्यक्तिमत्त्व आहे, असा माझा अजिबात दावा नाही. एखाद्या प्रज्ञावंत लेखकाला याहून वेगळे बुवा दिसू शकतील.’’

प्रमुख पाहुणे श्री. शंकर अभ्यंकरांचं स्वागत दिलीप माजगावकरांच्या हस्ते झालं. लेखिकेचा आणि माजगावकरांचा सत्कार अभ्यंकरांच्या हस्ते करण्यात आला.

❖



# वाचकांच्या मनातलं...

*वाचकांचा प्रतिसाद हाच लेखकाचा खरा पुरस्कार! हा प्रतिसाद मित्रांना कळवा, तसेच आम्हांलाही कळवा; म्हणजे तो आम्ही लेखकांपर्यंत पोहोचवू. प्रकाशक-लेखक-वाचक यांच्यात विचारांची देवघेव करण्यासाठी.*

## मेड इन चायना

गिरीश कुबेर,

तुमचं नवीन पुस्तक 'मेड इन चायना' वाचलं. सविस्तर आणि रंजक आहे.

केवळ घटनाक्रम वाचतोय असं न वाटता सलगपणानं, आटोपशीरपणानं एकेक प्रकरण कालसुसंगत इतिहास आणि वर्तमानाचा पट उभा करतं हे पुस्तकांचं सामर्थ्य आहे. ओघवती शैली आणि योग्य त्या ठिकाणी सविस्तर वाचण्यासाठी 'अधर्मयुद्ध' पुस्तकाचे रेफरन्स यामुळे त्याही पुस्तकाचं पुनर्वाचन झालं.

पूर्वी अरुण साधूंची पुस्तकं वाचली होतीच, पण त्यानंतर चीनसंदर्भात मराठीत असं सलग काही वाचलं नव्हतं. विशेषत: शी जिनपिंग यांचं नेमकेपणानं टिपलेलं व्यक्तिचित्रण अधिक भावलं.

आशुतोष यांनी घेतलेली मुलाखत उत्तम होतीच, पण निष्ठुरपणा आणि तुसडेपणा positive असतो हे भावलं.

धन्यवाद आणि नवीन लेखनासाठी शुभेच्छा!

**_राहूल आफळे_**, सातारा

### मुखपृष्ठावरील पुस्तकांविषयी

| | | |
|---|---|---|
| ◻ हिंदुत्व, मार्क्सवाद आणि भारत | विजय आपटे | ₹ १०००/- |
| ◻ चंद्रकांत कुलकर्णी सादर करीत आहे... | | ₹ ८००/- |
| ◻ प्यासा | सुधीर नांदगावकर | ₹ ६००/- |
| ◻ दत्तप्रसाद दाभोळकरांच्या कविता | | ₹ १५०/- |

कधी न गळणारा

## 'राजहंसी' मोहोर

राजहंस प्रकाशनचे अव्वल लेखक,
त्यांची गाजणारी पुस्तकं आणि रसिक वाचक यांची थेट गाठ दर बुधवारी घालून देणारा

**श्रवणीय साप्ताहिक उपक्रम (ऑडिओ पॉडकास्ट)**

**१ मे २०२४पासून सुरू...**

आमच्या नवनवीन योजनांसाठी बघत राहा

**'राजहंस ॲप'**

App Store — आयफोन आणि आयपॅडसाठी

Google Play — अँड्रॉइड फोन आणि टॅब्लेटसाठी

तुम्ही 'राजहंस'ला असेही भेटू शकता

Website : www.rajhansprakashan.com


## राजहंस प्रकाशन


- १०२५ सदाशिव पेठ, नागनाथ पाराजवळ, पुणे ४११०३०. ✆ २४४६५०६३/२४४७३४५९.
  E-mail : rajhansprakashan1@gmail.com | Website : www.rajhansprakashan.com
- राजहंस पुस्तक पेठ, साई सरस्वती, शिक्षकनगर, गल्ली क्र. ७च्या सुरुवातीस, परमहंसनगर, वनाजजवळ, पौड रोड, पुणे ४११०३८. ✆ ९३२२६३०७०३.
- शॉप नं. २, सखारामकृपा अपार्टमेंट, अमर हिंद मंडळासमोर, गोखले रोड, दादर (प.), मुंबई ४०००२८. ✆ २४२२३९०१.
- नरेश सबजीवाले, गुलमोहर हॉलसमोर, खामला रोड, नागपूर ४४००२५. ✆ ९३७२२२५२०१.
- राजहंस ग्रंथघर, अनुप देशपांडे, १०, शून्य संकुल, सहजीवन कॉलनी, समर्थनगर, छत्रपती संभाजीनगर ४३१००१. ✆ ९०९६९४३३६९.
- पंकज क्षेमकल्याणी, २, तळमजला, गुरुपुष्प अपार्टमेंट, आकाशवाणी केंद्रामागे, आनंद नगर, (सावरकर नगर), गंगापूर रोड, नाशिक - ४२२०१३. ✆ ९४२२२५२२०८
- अक्षरदालन, निर्मलाय प्लाझा, कोळेकर तिकटी, कोल्हापूर ४१६०१२. ✆ २६४६४२४.
- डॉ. उमेश करंबेळकर, ३२५ मंगळवार पेठ, रघुकुल अपार्टमेंट, सातारा ४१५००२. ✆ २८२५१०.
- मुग्धा शेवाळकर, तळमजला, साईदत्त अपार्टमेंट, सितारा बजाज शोरूमजवळ, शांतीनगर, फोंडा, गोवा ४०३४०१. ✆ ७३९७४६९३९० / ८६०५८९१०१९
- नंदादीप सर्व्हिसेस, २३६/१ साखर पेठ, प्लॉट नं १, नारायण कॉम्प्लेक्स, विणकर बागेसमोर, सोलापूर - ४१३००५ ✆ ९८२२८०७७१५.

# व्हेरिकोज व्हेन्स







## आजाराची वृद्धी व तीव्रता कमी करण्यासाठी उपयुक्त आयुर्वेदिक तेल

लक्षणे - पाय दुखणे, पायाला सूज येणे, पाय जड वाटणे, पायांच्या शिरा फुगून वेड्यावाकड्या होणे आणि प्रगत अवस्थेत तळपायाजवळ फुटून रक्तस्त्राव होणे. व्याधी दुर्धर अवस्थेत जाण्यापूर्वीच वापरण्यास सुरुवात करा.




सूचना : व्हेरिकोज व्हेन्स ही एक दुर्धर व्याधी आहे. हे तेल विकाराची तीव्रता कमी करणे व प्रगती रोखणे आणि वेदनांपासून आराम देण्यासाठी आहे. प्रत्येक व्यक्तीच्या प्रकृती, विकाराची तीव्रता आणि शारिरिक प्रतिसाद यानुसार परिणामांमध्ये फरक पडू शकतो.

| 100 ml पॅक | 200 ml पॅक |
|---|---|
| MRP Rs. 450/- | MRP Rs. 750/- |

(सर्व करांसहित)

**सर्वत्र प्रमुख मेडीकल स्टोर मध्ये उपलब्ध**

**वेरिहील कॅप्सूल्स**
सुद्धा उपलब्ध

**Esvee Pharmachem Pvt. Ltd.**
412, Narayanpeth, Pune - 411030.
Ph :020 24450072 / 73.

**Helplines** (10 am to 6 pm only) **: 7888011004 ; 9423044267**

Registered Rajhans Granthavedh (REGD.NO. : PCW / 133 / 2022-2024 RNI NO. MAHMAR / 2009 / 33647)
(Published on 15th of every month and posted on 20th of every month at S.P.COLLEGE PO, Pune)
Licence to post without Pre-payment No. - WPP-48


# केस गळतायेत?






मजबूत व निरोगी
केसांसाठी

## नोविग

रोज सकाळ - संध्याकाळ
१-१ गोळी

**मेडीकल व आयुर्वेदिक स्टोअर्समध्ये उपलब्ध**

आपल्या परिसरात उपलब्धतेसाठी Whats App वर संपर्क करा

**वितरक : एस्व्ही फार्माकेम प्रा. लि.** 412, नारायण पेठ, मुंजाबा लेन, पुणे- 411030.

eSVee 9423044267 7888011004 FIND US ON


प्रेषक : **राजहंस ग्रंथवेध, द्वारा : राजहंस प्रकाशन.** १०२५, सदाशिव पेठ, नागनाथ पाराजवळ, पुणे ४११०३०. फोन : २४४७३४५९

**सदरचे मासिक 'राजहंस' प्रकाशनाच्या वतीने मुद्रक, प्रकाशक रेखा दिलीप माजगावकर यांनी रिच प्रिंट्स, २७२ नारायण पेठ, पुणे ४११०३० येथे छापून १०२५ सदाशिव पेठ, नागनाथ पाराजवळ, पुणे - ४११०३० येथे प्रसिद्ध केले. संपादक : डॉ. सदानंद बोरसे**